


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

मुंबई कार्यालय - बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. संपर्क - ९८३३५९८३६२

पालघर कार्यालय - महावीर चेंबर बिल्डिंग नंबर ०२, शॉप नंबर १०, नवापूर रोड, बोईसर, तालुका पालघर, जिल्हा पालघर - ४०१५०१ संपर्क - ९५४५८००६६६

नाशिक कार्यालय - 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. संपर्क -९४२०६९१४२०

रायगड कार्यालय - जय गुरुदेव कॉम्प्लेक्स सेक्टर-१७, A-१०२, कामोठे नवी मुंबई- ४१०२०९. संपर्क - ८३५५८५५७५७

ठाणे कार्यालय- धारवानी आर्याना, सी-३०५, बारवी डॅम रोड, अंबरनाथ (प.), ठाणे. संपर्क-९३२२१०७५२१

* वर्ष ११ * अंक ४१ * * मुंबई * रविवार, दिनांक १४ जून २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## थोडक्यात...

### मोदी फ्रान्स - स्लोव्हाकियाच्या ६ दिवसीय दौऱ्यावर



■ **नवी दिल्ली :** पंतप्रधान मोदी १३ ते १८ जून या ६ दिवसांच्या दौऱ्यावर फ्रान्स आणि स्लोव्हाकियासाठी रवाना झाले आहेत. पंतप्रधान झाल्यानंतर मोदींची ही सातवी फ्रान्स भेट आहे. नीस शहरात ते राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील. यानंतर ते स्लोव्हाकियासाठी रवाना होतील. येथे ते १५ जूनपर्यंत राहतील. १६ जून रोजी ते पॅरिसला परत येतील. मोदी १७ जून रोजी जी ७ शिखर परिषदेत सहभागी होतील. स्लोव्हाकियात मोदी पंतप्रधान रॉबर्ट फिको आणि राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांची भेट घेतील.

### लेफ्टनंट जनरल धीरज सेठ नवे लष्करप्रमुख



■ **नवी दिल्ली :** केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची भारतीय लष्कराचे नवे प्रमुख (चीफ ऑफ आर्मी स्टाफ) म्हणून नियुक्ती केली आहे. सेठ सध्या उपसेनाप्रमुख (व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ) पदावर कार्यरत आहेत. ते विद्यमान लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांची जागा घेतील.

लष्करप्रमुखांचा कार्यकाळ ३ वर्षे किंवा वयाचे ६२ वर्षे (यापैकी जे आधी पूर्ण होईल) पूर्ण होईपर्यंत असतो.

### राहुल गांधी थोपटणार पेपरफुटी विरोधात दंड



■ **जयपूर :** नीट पेपरफुटीनंतर आता काँग्रेसने याविरोधात देशव्यापी आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. याची सुरुवात १७ जून रोजी कोटा येथून केली जाईल. कोटा येथे विद्यार्थी संमेलनात राहुल गांधी पेपरफुटी आणि तरुणांशी संबंधित मुद्द्यांवर संवाद साधतील.

## भारतीय हवाई दलाच्या विमानाला अपघात

# ५ जवान शहीद

आसाममध्ये 'लॅंडिंग'वेळी भीषण दुर्घटना | विमानाचे दोन तुकडे





१. स्कॉर्डन लिडर प्रशांत सिंग
२. फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार
३. एसजीटी जितेंद्र शर्मा
४. एजीव्ही खेमकरण कुमावत
५. एजीव्ही दानिश आलम

■ **वृत्तसंस्था**
**जोरहाट (आसाम), दि. १३ :**
येथे आज भारतीय हवाई दलाच्या एएन-३२ या मालवाहू विमानाचा रोरिया हवाई तळावर 'लॅंडिंग' करताना भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत ५ जवान शहीद झाले आहेत.

अपघातानंतर विमानाला आग लागून त्याचे दोन तुकडे झाले. दुर्घटनेत स्क्वाड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर वायू खेमाराम कुमावत आणि अग्निवीर वायू दानिश आलम हे ५ जवान शहीद झाले आहेत. विमान 'लॅंडिंग' दरम्यान धावपट्टीवरून घसरले आणि त्याला आग लागली. या दुर्घटनेत विमानाचा सह-वैमानिक वाचला असून, त्याला उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हवाई दलाकडून या अपघाताच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

प्राथमिक माहितीनुसार अपघातावेळी हे विमान अरुणाचल प्रदेशातून जोरहाटच्या दिशेने जात होते. सोव्हिएत बनावटीचे 'एएन-३२' हे दोन इंजिन असलेले 'टॅक्टिकल ट्रान्सपोर्ट' (लष्करी मालवाहू) विमान आहे. ईशान्य आणि हिमालयीन सीमांवरील दुर्गम भूप्रदेश आणि उंचावरील भागामध्ये हवाई दलासाठी हे विमान अनेक दशके महत्त्वाचे साधन ठरले.

दरम्यान, 'एएन-३२' विमानांचे यापूर्वी अपघात झाल्याची माहिती मिळाली. जोरहाट हवाई दल तळावरून अरुणाचल प्रदेशातील मेचुकाकडे निघालेले हवाई दलाचे हे विमान जून २०१९ मध्ये बेपत्ता झाले होते. त्या विमानात १३ जण होते. शोध मोहिमेनंतर अरुणाचल प्रदेशातील डोंगराळ भागात त्या विमानाचे अवशेष सापडले आणि त्यातील सर्वांना मृत म्हणून घोषित करण्यात आले.

चेन्नईहून पोर्ट ब्लेअरला जाणारे आणखी एक विमान जुलै २०१६ मध्ये बंगालच्या उपसागरावरून जात असताना बेपत्ता झाले होते. त्या विमानात २९ जण प्रवास करत होते. शोध मोहीम राबवूनही हे विमान अनेक वर्षे सापडले नाही. त्यातील सर्व प्रवाशांना मृत मानण्यात आले.

# महागाई दरात १२.९ टक्क्यांनी वाढ

## मे मध्ये अन्न महागाई ४.७८ टक्के



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर / मुंबई / नाशिक, दि. १३ :**
केंद्र सरकारने जाहीर केलेल्या ग्राहक किंमत निर्देशांक आधारित आकडेवारीनुसार मे २०२६ मधील किरकोळ महागाई दर ३.९३ टक्के राहिला. एप्रिलमध्ये हा दर ३.४८ टक्के होता. टक्केवारीच्या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास एप्रिलच्या तुलनेत मे महिन्यात महागाई दरात १२.९ टक्क्यांनी वाढ झाली.

पेट्रोल-डिझेलमध्ये फेब्रुवारीनंतर साडेसात ते आठ रुपये लिटर, सीएनजी किलोला सहा, घरगुती गॅसमध्ये ८९ रुपये सिलेंडर आणि व्यावसायिक गॅसमध्ये तेराशेहून अधिक वाढ झाली. त्याचवेळी रुपया डॉलरच्या तुलनेत जवळपास ५ ते ६ टक्क्यांनी घसरला आहे.

इंधन दरवाढीचा परिणाम वाहतूक, लॉजिस्टिक, भाज्या, फळे, दूध, धान्य आणि खाद्यतेलाच्या किंमतींवर होत असून महागाईचा दबाव सर्वसामान्यांच्या घरगुती अर्थकारणावर वाढत आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये १ डॉलर ९० ते ९१ रुपये आणि या महिन्यात ९५ ते ९६ रुपये राहिला.

**अन्न महागाई ४.७८ टक्के**
मे मध्ये अन्न महागाई ४.७८ टक्के पर्यंत पोहोचली. बाजारातील अंदाजे भाववाढ रुपयांमध्ये अशी : भाज्या : २ ते १० रुपये किलो, फळे : ३ ते १५ रुपये किलो, गहू-तांदूळ : १ ते ४ रुपये किलो, खाद्यतेल : ५ ते १५ रुपये लिटर, दूध : १ ते ३ रुपये लिटर, प्रक्रिया खाद्यपदार्थ : २ ते ६ टक्के.

**किलोमीटरला २ रुपये जादा खर्च**
वाहतुकदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार डिझेल भाववाढीनंतर ट्रक खर्चात ५ ते ८ टक्के वाढ झाली. दूरवरच्या मालवाहतुकीत किलोमीटर ला एक ते दोन रुपयांच्या अतिरिक्त खर्चाची वाढ झाली. कंटेनर व लॉजिस्टिक कंपन्यांनी ३ ते ७ टक्के अधिभार आकारण्यास सुरवात केली असल्याची माहिती मिळाली.

**अमेरिका धरसोडचा फटका**
अमेरिकेचे एकीकडे युद्धबंदी, तर दुसरीकडे क्षेपणास्त्र हल्ले अशा धरसोड धोरणाचा फटका आगामी काळात आणखी गंभीर वळणार पोचण्याची शक्यता आहे.

अर्थशास्त्र अभ्यासकांच्या माहितीनुसार पश्चिम आशियातील संघर्ष दीर्घकाळ चालल्यास पेट्रोल-डिझेल आणखी महाग होऊ शकते. अन्नधान्य महागाई वाढू शकते. वाहतूक खर्च वाढू शकतो. सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर ताण वाढू शकतो.

रिझर्व्ह बँकेला व्याजदर कपातीबाबत सावध भूमिका घ्यावी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय कमकुवत मान्सूनची शक्यता आणि जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे हेही महागाई वाढवणारे घटक ठरू शकतात.

### महागाई दराची टक्केवारी

आखाती युद्धामुळे पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे जागतिक ऊर्जा आणि खाद्य पदार्थांच्या किमतीत मोठी वाढ झाली. यामुळे मे २०२६ मध्ये जागतिक महागाई दरात लक्षणीय वाढ नोंदवली गेली. भारत वगळता इतर देशातील अंदाजित महागाई दर टक्क्यांमध्ये याप्रमाणे :

| देश | फेब्रुवारी २०२६ | मे २०२६ |
|---|---|---|
| भारत | ३.२१ | ३.९३ |
| अमेरिका | ३.४० | ४.२० |
| इंग्लंड | २.६० | ३.२० |
| इजिप्त | १२.२० | १३.२० |
| कॅनडा | २.२० | २.५० |
| तुर्की | ३२.३७ | ३२.६१ |
| इराण | ६०.५० | ६८.९० |

### जेवणाचा डबा दिवसाला १० ते ३० रुपयांनी महाग

गॅस सिलिंडर, भाजीपाला आणि अन्नधान्याच्या वाढत्या किमतींमुळे पोटभर जेवण परवडेना. मेसचा डबा दिवसाला १० ते ३० रुपयांनी महागला.शाकाहारी साठी १० ते २० आणि मांसाहारी साठी ३० रुपये अधिकचे द्यावे लागतात. मेसचे बील महिन्याला ८०० रुपयांनी वाढले.

## अपघातात तीन ठार

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १३ :**
गंगापूर रोडवरील बाबरगाव फाटा परिसरात आज घडलेल्या भीषण रस्ते अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला असून काही जण गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून स्थानिक नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

माहितीनुसार, बाबरगाव फाटा परिसरात वाहनांमध्ये झालेल्या जोरदार धडकेमुळे किंवा चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. जखमींना रक्तबंबाळ अवस्थेत बाहेर काढून गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात व नंतर संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले. उपचार सुरू असताना तिघांना मृत घोषित करण्यात आले. या अपघातात मृत्यू झालेल्यांची ओळख महादेव चंद्रकांत घुले, मीरा कडुबा पांडव आणि राजू देविदास अप्पा अशी पटली आहे.

# अर्थखाते मुख्यमंत्र्यांकडे राहावे

## संजय राऊतांचे विधान : तोडीचा दुसरा नेता दिसत नाही



दखल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
राज्याचे अर्थखाते मुख्यमंत्र्यांकडे राहावे, असे उद्धव ठाकरे शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. तसेच सध्या महायुतीत अर्थखाते सक्षमपणे सांभाळेल असा दुसरा कोणी नेता दिसत नसल्याची टिप्पणी राऊत यांनी केली.

स्वर्गीय अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि नवे असा संघर्ष टोकाचा असल्याची चर्चा आहे. तटकरे-पटेलांपुढे दादांचे कुटुंबीय हतबल झालेत काय? असा प्रश्न दादांच्या चाहत्यांना भेडसावत आहे.

अशातच, कुणी केंद्रात उघडपणे मंत्रीपद मागितले नसले, तरी केंद्रातील मंत्रीपदाच्या 'फिल्डींग' मध्ये अर्थमंत्री पद धक्क्याला लावल्याची भावना अजिदादांच्या चाहत्यांमध्ये आहे. 'महासागर मीडिया ग्रुप'ने 'घड्याळ फिरवताहेत उलटे' ही वृत्तमालिका प्रसिद्ध केली. याच पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी अर्थमंत्री पदाबाबत केलेल्या विधानाला मोठं महत्व प्राप्त झाल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

अजितदादांच्या विमान अपघातात निधन नंतर पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र अजितदादांकडील अर्थमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे.

### शरद पवारांचे चुकलेच..

राष्ट्रवादीची वाटचाल आणि सद्यःस्थितीवर 'सत्ता संघर्ष'

वाचा पान ४ वर

# कर्जमाफीच्या अटींवर तोडगा निघणार?

## कृषिमंत्र्यांची घोषणा : रोहित पवारांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस






■ **वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. १३ :**
अन्नत्याग आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. कृषी मंत्र्यांकडून चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या तरी कर्जमाफीतील जाचक अटी हटवून सर्व शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची विनाअट कर्जमाफी जाहीर झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माझे वडील, पत्नी आणि मुलं भावुक झाली आहेत. मुलं 'बाबा लवकर घरी या' असा निरोप देत आहेत, पण अन्नदात्याच्या न्यायासाठीचा हा लढा आता थांबणार नाही, असे रोहित पवार म्हणाले.

मनोज जरांगे यांच्यासह विविध शेतकरी संघटनांचे नेते आणि इतर पक्षांचे नेते आंदोलनस्थळी येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. शक्तिपीठ महामार्गासाठी हजारो कोटी रुपये खर्च करता, मग शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर अटी का? असा सवाल करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

**रोहित पवार यांच्या मागण्यांबाबत बैठक होणार- कृषिमंत्री**
पंढरपुरातील अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या मागण्यांची राज्य सरकारने दखल घेतल्याचे संकेत कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी दिले आहेत. रोहित पवार यांच्याशी दोन वेळा फोनवरुन चर्चा झाल्याचे सांगत भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही याबाबत चर्चा झाल्याची माहिती दिली. रोहित पवार यांच्या कर्जमाफीसंदभार्तील मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी मंगळवारी बैठक बोलावण्यात आली असून त्यातून सकारात्मक मार्ग निघेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगतानाच, सर्वांचे समाधान होणार नसले तरी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.

**सरसकट कर्जमाफी करा- थोरात**
रोहित पवार यांच्या आंदोलनाला बाळासाहेब थोरात यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. सरकारने या आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून पाहू नये, असे आवाहन करत थोरात यांनी महायुती सरकारवर जोरदार निशाणा साधला.

# आमच्याशी कुणी संपर्कच केला नाही..

## विलीनीकरणाच्या चर्चांवर सुप्रिया सुळेंचा खुलासा : भाजपवरही जोरदार हल्लाबोल



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांनी राज्याच्या राजकारणात खळबळ उडवली असतानाच खासदार सुप्रिया सुळे यांनी या सर्व चर्चांना स्पष्ट शब्दांत उत्तर दिले आहे. नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, विलीनीकरणाबाबत आमच्याशी कुणीही संपर्क केलेला नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही.

यावेळी त्यांनी भाजपवरही जोरदार टीका करत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फोडल्याचा आरोप केला. तसेच शेतकरी, अर्थव्यवस्था आणि विरोधकांच्या एकजुटीबाबतही त्यांनी सविस्तर भूमिका मांडली. सुळे म्हणाल्या की, लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. मात्र गेल्या काही वर्षांत विरोधी पक्षांना लक्ष्य केले जात आहे.

आधी शिवसेना फोडली, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस फोडली गेली. आता तृणमूल काँग्रेसबाबतही त्याच प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. हे लोकशाहीसाठी अत्यंत दुर्दैवी आहे, असे म्हणत त्यांनी केंद्र सरकारच्या राजकारणावर अप्रत्यक्ष टीका केली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलेल्या विधानाबाबत विचारले असता सुळे म्हणाल्या की, त्यांनी ना ते विधान ऐकले आहे ना वाचले आहे. त्यामुळे त्यावर भाष्य करणे योग्य नाही.

**पवारांवर टीका केली की हेडलाईन**
ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पवार कुटुंबावर केलेल्या आरोपांबाबत विचारले असता सुळे यांनी मिश्किल शैलीत उत्तर दिले. गेली बारा वर्षे आम्ही सत्तेत नाही. पण आजही सत्तर वर्षांतील सगळ्या चुकांचा ठपका आमच्यावर ठेवला जातो. पवारांवर टीका केली की हेडलाईन मिळते, बातमी होते. त्यामुळे अनेकजण तेच करतात. पण लोकशाहीत मला बोलण्याचा अधिकार आहे, तसाच इतरांनाही असल्याचे त्या म्हणाल्या.

# भारतीय मल्टी लेयर्ड बॅलिस्टिक डिफेन्स सिस्टीमची चाचणी यशस्वी

## ५ हजार किमी वरून येणाऱ्या क्षेपणास्त्राला पाडणार



■ **नवी दिल्ली, दि. १३ :**
भारत आता लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा, अगदी आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या धोक्यांचाही सामना करू शकतो. डीआरडीओने सलग ३ उड्डाण चाचण्या केल्या, ज्यात मल्टी-लेयर्ड बॅलिस्टिक मिसाईल डिफेन्स प्रणालीचे प्रदर्शन करण्यात आले.

यात आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र श्रेणीपर्यंतच्या धोक्यांसह बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांना रोखण्याची आणि निष्प्रभ करण्याची क्षमता देखील समाविष्ट आहे. ही स्वदेशी तंत्रज्ञान शत्रूच्या क्षेपणास्त्रांना लक्ष्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच हवेत नष्ट करते. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी १३ जून रोजी चाचणीचे फोटो अकाउंटवर शेअर केले आहेत. यासोबतच नेव्हल अँटी शिप मिसाईल-मीडियम रेंजचीही चाचणी करण्यात आली. याला भारताच्या सागरी हल्ल्याची आणि संरक्षण कौशल्याची क्षमता मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठी उपलब्धी मानले जात आहे.

# नक्षलवाद्यांचे आठ तळ उद्ध्वस्त

## २३ आयईडींसह शस्त्रसाठा जप्त



■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १३ :**
छत्तीसगडमधील नक्षलप्रभावित बिजापूर आणि गरियाबंद जिल्ह्यांत सुरक्षा दलांनी राबविलेल्या शोधमोहीमेत नक्षलवाद्यांचे आठ गुप्त तळ उद्ध्वस्त केले. या कारवाईत २३ जिवंत आयईडी, शस्त्रास्त्रे आणि स्फोटकनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले.

बिजापूर जिल्ह्यातील अद्री, हर्रा आणि मदुमपारा परिसरातील घनदाट जंगलात नक्षलवाद्यांची उपस्थिती असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) १९९ व्या बटालियनने विशेष शोधमोहीम हाती घेतली. कमांडंट आनंद कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सेकंड-इन-कमांड कुमार नीरज यांच्या देखरेखीखाली संयुक्त पथकाने जंगल परिसराची सखोल तपासणी केली. बी/१९९ कंपनीचे नेतृत्व कंपनी कमांडर राजीव कुमार यांनी, तर एफ/१९९ कंपनीचे नेतृत्व निरीक्षक के. बी. पांडा यांनी केले. या मोहिमेदरम्यान जवानांनी नक्षलवाद्यांचे आठ गुप्त तळ शोधून काढत ते उद्ध्वस्त केले.

शस्त्रास्त्रे, आयईडी आणि स्फोटक साहित्य जप्त कारवाईदरम्यान एक बॅरल ग्रेनेड लॉन्चर रायफल, एक ८ एमएम रायफल आणि एक १२-बोर रायफल जप्त करण्यात आली. तसेच २१ आयईडी, कॉर्डेक्स वायर, सेफ्टी फ्युज, इलेक्ट्रिक वायर, एअरगनच्या गोळ्या, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर साहित्य असा एकूण ५८ प्रकारच्या वस्तूंचा साठा हस्तगत करण्यात आला.

गरियाबंद जिल्ह्यातील दंडईपाणी जंगल परिसरातही सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांचा एक तळ उद्ध्वस्त केला.

# सरकारच्या विकास, विश्वास आणि जनकल्याणाच्या प्रवासाची 12 वर्षे

## विकसित भारताच्या दिशेने ऐतिहासिक वाटचाल - मंत्री ॲड. आशिष शेलार

**पनवेल प्रतिनिधी।**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत देशाने सर्वांगीण विकासाची अभूतपूर्व झेप घेतली असून विकसित, आत्मनिर्भर आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्क मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले. पनवेल येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




या वेळी आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अरुणशेठ भगत, मंगेश वाकडीकर, वैकुंठ पाटील, दीपक बेहेरे, अमित जाधव, रंजना वास्कर, भूपेंद्र पाटील, बबन मुकादम, ममता म्हात्रे, रवी भोईर, विक्रम साबळे, प्रिया मुकादम, संतोष शेलार, आनंद ढवळे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेलार म्हणाले की, २०१४ पासून मोदी सरकारने सुशासन, पारदर्शकता आणि जनकल्याण यांना प्राधान्य देत देशात विकासाचे नवे पर्व सुरू केले. "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास" या मंत्राद्वारे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याचे कार्य झाले आहे. जनधन योजना, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत अभियान यांसारख्या योजनांमुळे कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून आला आहे.

शेतकरी, महिला, युवक आणि लघुउद्योजकांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी आणि विश्वकर्मा योजनेद्वारे लाखो लाभार्थ्यांना आर्थिक बळ मिळाले आहे. महिलांसाठी 'लखपती दीदी' आणि 'सुकन्या समृद्धी' यांसारख्या योजनांनी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला केला आहे.

देशाच्या पायाभूत सुविधांमध्ये झालेली विक्रमी गुंतवणूक ही मोदी सरकारची मोठी उपलब्धी असल्याचे सांगताना त्यांनी राष्ट्रीय महामार्ग, मेट्रो नेटवर्क, वंदे भारत रेल्वे, नवीन विमानतळ आणि ग्रामीण रस्ते विकासाचा उल्लेख केला. डिजिटल इंडिया, भारतनेट आणि थेट लाभ हस्तांतरणामुळे प्रशासन अधिक पारदर्शक व गतिमान झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि दहशतवादविरोधी कठोर धोरणांमुळे भारताची जागतिक स्तरावरील प्रतिमा अधिक मजबूत झाली आहे. जी-२० अध्यक्षपद, 'वसुधैव कुटुंबकम'चा संदेश, लस मैत्री उपक्रम आणि वाढती परकीय गुंतवणूक यामुळे भारत जगातील प्रभावशाली राष्ट्र म्हणून उदयास आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

यापूर्वी मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते मंडळाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. पत्रकार परिषदेत मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या विकासकामांचा आणि जनकल्याणकारी योजनांचा सविस्तर आढावा सादर करण्यात आला.



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयतेसाठी सर्वस्व अर्पण केले – रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार

**सातारा प्रतिनिधी।**
महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनकल्याणकारी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयतेसाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले आहे, असे गौरवोद्गार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार यांनी काढले. रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सातारा येथे आयोजित अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात झालेल्या या भव्य सोहळ्यात शरद पवार यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या पत्नी शकुंतला ठाकूर यांचा मानपत्र, शाल, सन्मानचिन्ह व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रकांत दळवी, श्रीनिवास पाटील, भगीरथ शिंदे, डॉ. अनिल पाटील, खासदार नितीन पाटील, आमदार विश्वजित कदम, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शरद पवार यांनी रामशेठ ठाकूर यांच्या समाजसेवा, शिक्षणप्रेम आणि दानशूरतेचे कौतुक करत रायगडच्या विकासासह रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीतील त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. रयत शिक्षण संस्थेसाठी त्यांनी दिलेल्या १३५ कोटी रुपयांहुन अधिक देणगीमुळे हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली असल्याचे सांगण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेनेच आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिल्याची भावना व्यक्त केली. "रयतशिवाय राम घडला नसता," असे सांगत त्यांनी संस्थेच्या विकासासाठी कायम योगदान देत राहण्याची ग्वाही दिली.

आमदार विश्वजित कदम यांनी "दातृत्वाचे पहिले नाव म्हणजे रामशेठ ठाकूर" असे गौरवोद्गार काढले, तर ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचा आढावा घेतला. शिक्षण, समाजकारण, उद्योग आणि जनसेवा या क्षेत्रांतील रामशेठ ठाकूर यांचे योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## नडगाव दगडखाणीतील पाणी महाडची तहान भागविणार दोन महिन्यांत योजनेला प्रारंभ - ना. भरतशेठ गोगावले

**महाड प्रतिनिधी।**
महाड शहराच्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नडगाव येथील दगडखाणींमधील पाणीसाठ्याचा उपयोग करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे. महाडचे आमदार तथा राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकासमंत्री ना. भरतशेठ गोगावले यांनी नडगाव येथील खाण परिसराची पाहणी करून महाड शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याची घोषणा केली.

सध्या या खाणींमधून दररोज सुमारे १२ लाख लिटर पाणी टँकरद्वारे करंजखोल येथील जलशुद्धीकरण केंद्रात नेऊन महाड शहराला पुरवठा केला जातो. उत्खननामुळे तयार झालेल्या तीन मोठ्या तलावांमध्ये प्रचंड प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असून तो महाड शहराची किमान आठ महिने पाण्याची गरज भागवू शकतो. प्रयोगशाळेतील तपासणीत



हे पाणी पिण्यास योग्य असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

यावेळी नगराध्यक्ष सुनील कविस्कर, मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, नगरसेवक ॲड. निखिल शिंदे, प्रमोद महाडिक, विद्या देसाई, ॲड. सनी जाधव, सिद्धेश पाटेकर तसेच पाणीपुरवठा विभागाचे अभियंता भोईर आणि शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

माध्यमांशी बोलताना ना. गोगावले म्हणाले की, तलावातील पाणी थेट जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी सुमारे दोन कोटी रुपयांची योजना प्रस्तावित करण्यात येणार आहे. यासाठी नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. मंजुरी मिळाल्यानंतर पुढील दोन महिन्यांत कामाला सुरुवात करण्याचा प्रयत्न राहील. हा प्रकल्प नडगाव ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच राबविला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाड शहराला दररोज सुमारे ५० लाख लिटर पाण्याची आवश्यकता असताना सध्या विविध स्रोतांद्वारे केवळ ३० ते ३५ लाख लिटर पाणी उपलब्ध होत आहे. त्यामुळे नडगाव तलावावरील ही योजना महाडच्या पाणीप्रश्नावर प्रभावी उपाय ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड आणि महाड परिसरातील बांधकामांसाठी दगड काढल्यानंतर तयार झालेल्या खाणींमध्ये जलसाठ्याची व्यवस्था केली होती. त्याच शिवकालीन तंत्राचा लाभ आजच्या महाडकरांनाही मिळणार असल्याचे चित्र या योजनेमुळे निर्माण झाले आहे.

# १५ जूनपासून शाळा सुरू

## नवीन अभ्यासक्रमाची पुस्तके अद्याप उपलब्ध नाहीत

**सुधागड-पाली प्रतिनिधी।**
सुधागड तालुक्यातील मराठी व इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये अद्याप नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध झालेली नाहीत. १५ जूनपासून शाळा सुरू होत असल्याने पालकवर्गात संभ्रम निर्माण झाला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या नवीन अभ्यासक्रमाला मंजुरी दिली असली तरी पाली परिसरात पुस्तकांचा तुटवडा असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP) तयार करण्यात आलेला हा अभ्यासक्रम जून २०२६ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. बालभारतीतर्फे नवीन पाठ्यपुस्तके तातडीने उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असून शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गांचे आयोजनही करण्यात येणार आहे.




महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत सहावीच्या अभ्यासक्रम आराखड्याला राज्यस्तरीय सुकाणू समितीने हिरवा कंदील दिला. या बैठकीस शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, एससीईआरटीचे संचालक डॉ. हेमंत वसेकर, बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक, शिक्षण संचालक महेश पालकर व कृष्णकुमार पाटील यांच्यासह सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते.

नवीन अभ्यासक्रमानुसार अध्ययन निष्पत्तीवर आधारित आराखडा तयार करण्यात आला आहे.

## अलिबाग आरपीआय तालुकाध्यक्ष प्रमोद गायकवाड भिमरत्न पुरस्काराने सन्मानित

**पेण प्रतिनिधी।**
पुण्यातील एस.डी. ओव्हाळ ट्रस्ट व किमया आश्रम यांच्या वतीने यंदाचा भिमरत्न गौरव पुरस्कार अलिबाग तालुक्यातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे तालुकाध्यक्ष प्रमोद गायकवाड यांना प्रदान करण्यात आला. वानवडी येथील महात्मा ज्योतिबा फुले सांस्कृतिक भवन येथे झालेल्या भव्य सोहळ्यात केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते पुरस्कार



प्रदान करण्यात आला. यावेळी अभिनेत्री स्नेहल तरडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना आठवले यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या युवकांचा सन्मान आवश्यक असल्याचे सांगितले. हा पुरस्कार सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारा असून बाबासाहेबांच्या चळवळीला बळ देणारा ठरत असल्याचे आयोजकांनी सांगितले. यामुळे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल असेही यावेळी नमूद करण्यात आले असे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला अशी माहिती देण्यात आली

### तळा शहरात नागरिकांच्या नळाला गढूळ पाणी.

**तळा** तळा शहरातील नागरिकांच्या नळाला लाल रंगाचे गढूळ पाणी येत असल्याने शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे.शहरात काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून भर उन्हाळ्यात गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागत आहे. अंबेळी व धरण या दोन ठिकाणी असलेल्या नगरपंचायतीच्या बोरिंगच्या माध्यमातून शहराला पाणी पुरवठा केला जातो.दरवर्षी प्रमाणे एप्रिल,मे व जून महिन्यात असलेली पाण्याची टंचाई याही वर्षी कायम आहे.काही ठिकाणी चार दिवस आड पाणी येत असून मागील दोन दिवसांपासून गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे.परिणामी गावातील महिलांना विकतचे पाणी घ्यावे लागत असून काही महिलांना भर उन्हात पाण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागत आहे. मागील दोन ते तीन दिवसांपासून तळा शहरात लाल रंगाचा गढूळ पाण्याचा पुरवठा केला

## कर्जत रेल्वे पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

### लोकलमधील चाकूहल्ल्याचा अवघ्या 12 तासांत छडा

**कर्जत प्रतिनिधी।**
सीएसएमटी-खोपोली लोकलमधील प्रवाशावर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी कर्जत रेल्वे पोलिसांनी अवघ्या 12 तासांत दोन आरोपींना अटक करून गुन्ह्याचा छडा लावला आहे. रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत महत्त्वाची ठरली असून पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सतीश कुमार बोलामनी पाठक (26, रा. मस्जिद बंदर, मुंबई) हे भायखळा स्थानकावरून सीएसएमटी-खोपोली लोकलच्या लगेज डब्यातून प्रवास करत होते. वांगणी स्थानकानंतर सीटवर बसण्याच्या किरकोळ कारणावरून काही तरुणांमध्ये वाद झाला. हा वाद वाढून हाणामारीत रूपांतरित झाला आणि आरोपींनी फिर्यादीच्या पोटात चाकूने वार करून गंभीर दुखापत केली तसेच शिवीगाळ व मारहाण केली.



या प्रकरणी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 80/2026 नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच कर्जत रेल्वे पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कड यांच्या पथकाने उल्हासनगर, शेलू, नेरळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी केली. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढत नेरळमधील ममदापूर परिसरातून दोघांना ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे इब्रान इद्रिस अन्सारी (18, नेरळ) आणि करण कन्हैयालाल अग्रवाल (22, शेलू) अशी आहेत. दोघांना रात्री 9.25 वाजता अटक करण्यात आली. यातील आणखी एक आरोपी सिद्धार्थ गायकवाड फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

ही कारवाई मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त राकेश एम. कलासागर, पोलीस उपआयुक्त प्रज्ञा जेडगे, सहाय्यक आयुक्त नंदराज पाटील तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या यशस्वी कारवाईबद्दल रेल्वे पोलिसांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

रेल्वे पोलिसांनी तपासादरम्यान आरोपींच्या हालचालींचे तांत्रिक विश्लेषण करून गुन्ह्यात वापरलेले मार्ग, वेळ आणि ठिकाण यांचा सखोल अभ्यास केला.

### संदीप मालप यांची भाजप वरळी वॉर्ड १९८ महामंत्रीपदी नियुक्ती

**महाड** महाड तालुक्यातील चिंभावे-हळदवणेवाडी गावचे सुपुत्र आणि सामाजिक कार्यकर्ते संदीप मालप यांची भाजपच्या वरळी विधानसभा वॉर्ड क्रमांक १९८ च्या महामंत्री (वॉर्ड सरचिटणीस) पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

वॉर्ड अध्यक्ष शिवाजी जाधव यांच्या शिफारशीनुसार आणि मुंबई भाजप उपाध्यक्ष किरण शेलार यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. दरेकर-दळवी गटाचे समर्थक म्हणून ओळख असलेल्या मालप यांची ही निवड पक्ष संघटन बळकटीसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

आपल्या प्रतिक्रियेत मालप यांनी वॉर्डातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना पोहोचवण्याचा आणि संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल महाड व वरळी परिसरात आनंद व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## म्हसळा पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी

### CEIR पोर्टलच्या आधारे हरवलेला मोबाईल मूळ मालकाला परत

**म्हसळा प्रतिनिधी।**
म्हसळा तालुक्यातील सावर येथील शेतकरी पांडुरंग काशिनाथ दिवेकर हे शेतकरी असुन दि. १९ मार्च रोजी म्हसळा बाजारपेठ येथुन मोबाईल हरविल्याची तक्रार म्हसळा पोलिस ठाण्यात नोंदविण्यात आली होती, म्हसळा पोलिसांनी सी ई आय आर (CEIR) या पोर्टलच्या आधारे तांत्रिक तपासाव्दारे मोबाईल ट्रेस करून शोध सुरू केला असता मुंबई इथे मोबाईल सापडल्याची माहिती देण्यात आली. या वेळी म्हसळा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस



निरीक्षक रविंद्र पारखे यांनी दि.10 जुन 2026 रोजी मोबाईल फोनचे मूळ मालक पांडुरंग दिवेकर यांना हरवलेला मोबाईल सुपूर्द करण्यात आला. यावेळी त्यांच्या सोबत पो. कॉ. गजेंद्र कांबळे, मनोज दिवेकर उपस्थित होते.

या कौतुकास्पद कामगिरी मुळे सावर ग्रामस्थांनी म्हसळा पोलिसांचे आभार व्यक्त केले.

## भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने प्राणी नियंत्रण केंद्र कार्यान्वित



**मुरुड जंजिरा प्रतिनिधी।**
मुरुड शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक पाखाड्यांमध्ये हे कुत्रे नागरिकांच्या अंगावर धावून येत असल्याने सुरक्षा धोक्यात आली होती. या पार्श्वभूमीवर मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी अलंकापुरी येथे अत्याधुनिक प्राणी नियंत्रण केंद्र सुरू केले आहे.

या केंद्राचे व्यवस्थापन पुणे येथील पेटफोर्स संस्थेकडे सोपविण्यात आले असून भटके कुत्रे मानवतावादी पद्धतीने पकडून त्यांचे निर्जंतुकीकरण व वैद्यकीय उपचार केले जाणार आहेत. सुमारे 100 कुत्र्यांसाठी आश्रयगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी, पुरेसा स्टाफ आणि नियोजन यावर या प्रकल्पाचे यश अवलंबून असल्याचे नागरिकांचे मत आहे. अधिक वेगाने कुत्रे पकडून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणीही होत आहे.

### जाहीर नोटीस

जावक क्र.: SAC/Desk-13/Wadhona Industries Pvt. Ltd./Aerial Distance/179/2026
साखर आयुक्त कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे – ४११००५ दिनांक : ११/०६/२०२६

या नोटीसीद्वारे महाराष्ट्रातील साखर कारखाना असलेल्या सर्व उद्योजकांना कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे प्रस्तावित साखर कारखाना उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या हवाई अंतर प्रमाणपत्राच्या मागणीबाबतचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

अस्तित्वात असलेल्या अथवा नवीन साखर कारखान्यांपैकी कोणताही साखर कारखाना प्रस्तावित कारखान्यापासून 25 कि.मी. हवाई अंतराच्या आत असल्यास, त्यासंबंधीची हरकत साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – 411005 या पतयावर अथवा commsugar.tech@gmail.com या ई-मेलवर दि. ३०/०६/२०२६ पूर्वी लेखी स्वरूपात नोंदवावी.

| अनुक्रमांक | कारखान्याचे नाव |
|---|---|
| ०१ | वाढोणा इंडस्ट्रीज प्रा. लि., गट क्र. १२१, मौजे पवना, ता. हिमायतनगर, जि. नांदेड, महाराष्ट्र, पिन-४३१८०२ |

वरीलप्रमाणे प्रस्तावित साखर कारखान्याने मागणी केलेल्या हवाई अंतर प्रमाणपत्राच्या निर्गमनाबाबत, ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील कलम ६-ब तसेच सन २००६ मधील सुधारणेनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक ०३.१२.२०२१ रोजीच्या राजपत्र अधिसूचनेतील तरतुदींनुसार, नवीन अथवा विद्यमान साखर कारखान्यांची काही हरकत असल्यास, संबंधित कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात दोन प्रती दिनांक ३०.०६.२०२६ पूर्वी या कार्यालयास सादर कराव्यात.

स्थळ : पुणे
दिनांक : ११/०६/२०२६

सही/-
(डॉ. संजय कोलते)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे

### राज्यस्तरीय 'लालपरी गौरव रत्न' पुरस्कार कर्जतच्या मिठ्ठू आंधळे यांना

**कर्जत** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने प्रथमच प्रदान करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'लालपरी गौरव रत्न' पुरस्काराने कर्जत एसटी आगारातील वाहक मिठ्ठू त्रिंबक आंधळे यांना सन्मानित करण्यात आले आहे. उत्कृष्ट सेवा, विक्रमी उत्पन्न आणि समाजाभिमुख कार्याच्या आधारे राज्यभरातील वाहकांमधून त्यांची प्रथम क्रमांकासाठी निवड झाली.

मुंबई येथे झालेल्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी त्यांच्या पत्नी वैशाली आंधळे आणि चिरंजीव जय आंधळे उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील रहिवासी असलेले आंधळे हे गेल्या अनेक वर्षांपासून कर्जत आगारात कार्यरत असून प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वागणूक आणि कर्तव्यदक्षतेमुळे ते सर्वदूर परिचित आहेत.

## सीव्हीआरएस फिटनेस ओपीडी' ठरतेय रुग्णांसाठी वरदान

**तळा प्रतिनिधी।**
वालावलकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी अंतर्गत २०२४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'सीव्हीआरएस (CVRS) फिटनेस ओपीडी' विभागाने अल्पावधीतच आरोग्यसेवेत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. विशेषतः हृदय आणि श्वसनविकार असलेल्या रुग्णांच्या पुनर्वसनासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या फिटनेस मूल्यांकनासाठी हा विभाग अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे आजार बळावत असताना, सीव्हीआरएस फिटनेस ओपीडी पुराव्यावर आधारित म्हणजेच संपूर्ण तपासणी नंतर फिजिओथेरपी आणि व्यायाम कार्यक्रमांच्या माध्यमातून रुग्णांचे जीवनमान उंचावण्यासाठी कार्यरत आहे. या विभागाचा मुख्य उद्देश केवळ उपचार करणे नसून, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा देऊन आजारांना दूर ठेवणे हा आहे.



अशी माहिती या विभागाच्या डॉ. सौ. आस्मा शर्मा यांनी दिली. या ओपीडीमध्ये कार्डियाक आणि पल्मनरी रिहॅबिलिटेशनसह वजन व्यवस्थापनावर विशेष भर दिला जातो. रुग्णांचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी हा विभाग सज्ज असून, यामध्ये खालील चाचण्यांचा समावेश आहे.

बीएमआय आणि वेस्ट-हिप रेशो, स्नायू शक्ती आणि लवचिकता चाचणी, मॉडिफाईड हार्वर्ड स्टेप टेस्ट, सिक्स-मिनिट वॉक टेस्ट या विशेष चाचण्या केल्या नंतरच प्रत्येक रुग्णाची शारीरिक स्थिती लक्षात घेऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र 'वैयक्तिकृत व्यायाम कार्यक्रम' तयार केला जातो, जो त्यांच्या जलद रिकव्हरीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

## मलेशिया येथे झालेल्याआंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेमध्ये महाडच्या दिशा अबॅकस च्या मुलांचे घवघवीत यश

**महाड प्रतिनिधी।**
दिनांक 4 जून 2026 रोजी मलेशिया येथे अबॅकस स्पर्धा पार पडल्या. यामध्ये 12 देशांनी सहभाग घेतला होता. एकूण तीन हजार विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. जानेवारी 2026 रोजी झालेल्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेमधून ह्या मुलांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. संपूर्ण भारतातून 47 विद्यार्थी 2 जूनला स्पर्धेसाठी रवाना झाले.5 मिनिटात 120 गणिते बेरीज आणि वजाबाकी असा पहिला पेपर. दुसरा पेपर पाच मिनिटे 120 गणित बेरीज वजाबाकी गुणाकार भागाकार असे दोन्ही पेपर मिळून चॅम्पियन ट्रॉफी



महाडच्या दिशा अबॅकस बाजी मारली. जय महेश शितोळे ,धनदा भगवान अवसरे ,इरा केतन शेठ, त्या मुलांनी हे यश मिळवत जगात आपल्या देशाचे महाड रायगड चे नाव उज्वल केले.

आज पर्यंत तैवान ,व्हियेतनाम, भारत आणि मलेशिया येथे आयोजित अबॅकस स्पर्धेत दिशा अबॅकस च्या विद्यार्थ्यांनी सातत्याने दैदिप्यमान यश मिळवले आहे. दिशा अबॅकसच्या संचालिका सौ. भारती वडाळकर मॅडम आणि सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन ह्या मुलांना लाभले. सर्व स्तरातून या मुलांवर कौतुकांचा वर्षाव होत आहे

**शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रादेशिक पक्षांमधील फुटींनी भारतीय राजकारणाला नवा संदर्भ दिला. उत्तुंग नेतृत्व असलेल्या पक्षांमध्येही मतभेदांमुळे विभाजन होऊ शकते, हे त्यातून दिसले. पक्षातील नेतृत्वाचे केंद्रीकरण, पुढील पिढीच्या नेतृत्वाबाबतचे प्रश्न, स्थानिक नेत्यांमधील स्पर्धा आणि सत्तेच्या दीर्घकाळाच्या वापरातून निर्माण होणारा असंतोष हे आता बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पक्षाच्या जीवावर उठणारे मुद्दे ठरले आहेत.**

# पश्चिम बंगालमध्ये ‘महाराष्ट्र पॅटर्न’

राज्यरंग

राही भिडे, ज्येष्ठ पत्रकार



पश्चिम बंगालच्या राजकारणात गेल्या दीड दशकात सर्वाधिक प्रभावी ठरलेले एक नाव म्हणजे ममता बॅनर्जी. डाव्या आघाडीच्या प्रदीर्घ सत्तेला धक्का देत त्यांनी तृणमूल काँग्रेसला राज्यातील प्रमुख राजकीय शक्ती म्हणून उभे केले आणि बंगालच्या राजकारणाचा चेहरामोहराच बदलून टाकला; मात्र कोणत्याही पक्षाचा सर्वात कठीण काळ हा विरोधकांशी लढताना नसतो, तर पक्षांतर्गत असंतोष उफाळून येतो तेव्हा असतो. सध्या ममता बॅनर्जींना अशाच प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. एखाद्या पक्षातील आमदारांचा फुटीर गट तयार होणे कवा खासदारांमध्ये नाराजी वाढणे, ही केवळ संघटनात्मक समस्या नसते. ती नेतृत्वावरील विश्वास, निर्णयप्रक्रिया आणि पक्षाच्या भवितव्याबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची अभिव्यक्ती असते. पक्षातील मोठा गट वेगळी भूमिका घेऊ लागल्याचा थेट परिणाम पक्षाच्या जनाधारावर आणि कार्यकर्त्यांच्या मनोबलावर होतो. तृणमूल काँग्रेससारख्या व्यक्तिकेंद्रित पक्षासाठी तर हे आव्हान अधिक गंभीर ठरू शकते. ममता बॅनर्जी यांचे राजकीय यश त्यांच्या संघर्षशील प्रतिमेवर उभे आहे. रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱ्या, केंद्र सरकारशी दोन हात करणाऱ्या आणि बंगाली अस्मितेचा मुद्दा प्रभावीपणे मांडणाऱ्या नेत्या म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली; परंतु दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर कोणत्याही पक्षात सत्तेचा थकवा, गटबाजी आणि नेतृत्वाविषयी प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक असते. सत्तेची केंद्रित रचना अनेकदा नव्या नेतृत्वाला संधी देण्यात अपयशी ठरते आणि त्यातून असंतोष



वाढतो. याचाच फायदा विरोधक घेतात. आमदारांपाठोपाठ तृणमूल काँग्रेसचे खासदारही फुटल्याने याबाबतच्या चर्चेने देशात जोर धरला.

पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. दुसरीकडे काँग्रेस आणि डावे पक्षही नव्याने राजकीय अवकाश शोधत आहेत. अशा परिस्थितीत तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद वाढले, तर त्याचा सर्वाधिक लाभ विरोधी पक्षांना होऊ शकतो. कारण निवडणुका केवळ मतांच्या बळावर जकल्या जात नाहीत; त्यासाठी संघटनेची एकजूट आणि कार्यकर्त्यांचा आत्मविश्वासही तितकाच महत्त्वाचा असतो. मात्र, ममता बॅनर्जी यांच्या राजकीय कारकिर्दीकडे पाहता संकटांमधून मार्ग काढण्याची क्षमता वारंवार दिसून आली आहे. अनेक वेळा त्यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचे अंदाज व्यक्त करण्यात आले; पण त्यांनी पुनरागमन करून टीकाकारांना उत्तर दिले. त्यामुळे सध्याचे आव्हान कितीही गंभीर वाटत असले, तरी त्याचा अंतिम परिणाम काय होईल, हे सांगणे अद्याप घाईचे ठरेल. खरा प्रश्न ममता बॅनर्जी यांच्या वैयक्तिक राजकीय भवितव्याचा नाही; तर तृणमूल काँग्रेस पक्षाच्या संस्थात्मक ताकदीचा आहे. पक्ष केवळ एका व्यक्तीच्या करिष्म्यावर टिकून राहू शकतो का, की तो व्यापक नेतृत्व विकसित करून पुढील पिढीसाठी स्वतःला सक्षम बनवू शकतो, या प्रश्नाचे उत्तर आगामी काळात मिळेल. राजकारणात कोणतीही सत्ता कायमस्वरूपी नसते. जनतेचा विश्वास, पक्षाची अंतर्गत एकता आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता यावरच राजकीय अस्तित्व अवलंबून असते. तृणमूल काँग्रेससमोर खरोखरच फुटीचे संकट उभे राहत असेल, तर ममता बॅनर्जींसाठीच नव्हे, तर पश्चिम बंगालच्या राजकीय भवितव्यासाठीही महत्त्वाचा टप्पा ठरेल.

२०११ मध्ये डाव्या आघाडीच्या तब्बल ३४ वर्षांच्या सत्तेला धक्का देत ममता बॅनर्जी यांनी बंगालच्या राजकारणात एका नव्या युगाची सुरुवात केली. ‘परिवर्तन’च्या घोषणेसह सुरू झालेला हा प्रवास अनेक निवडणुकांमधील विजय, मजबूत जनाधार आणि व्यक्तिकेंद्रित नेतृत्वामुळे अधिक बळकट होत गेला; मात्र कोणत्याही पक्षाचा किंवा नेतृत्वाचा राजकीय उत्कर्ष कायमस्वरूपी नसतो. काळाच्या ओघात सत्ताविरोधी भावना, संघटनात्मक विसंगती, नेतृत्वाभोवतीचे केंद्रीकरण आणि नव्या राजकीय आव्हानांमुळे मजबूत वाटणाऱ्या पक्षांनाही उतरती कळा लागते. अलीकडच्या काळात तृणमूल काँग्रेसमध्ये वाढत असलेली अंतर्गत अस्वस्थता, विविध गटांमधील मतभेद आणि नेतृत्वाच्या उत्तराधिकाराबाबत निर्माण होत असलेली चर्चा पाहता पश्चिम बंगालमध्येही ‘महाराष्ट्र पॅटर्न’सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अर्थात, महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी आणि बंगालची परिस्थिती यांच्यात मूलभूत फरक आहेत, तरीही पक्षातील अंतर्गत तणाव वाढत गेल्यास होणारे दूरगामी परिणाम केवळ तृणमूल काँग्रेसपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर पश्चिम बंगाल आणि राष्ट्रीय राजकारणालाही प्रभावित करू शकतात. तृणमूल काँग्रेसमधील अनेक नेते स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. स्थानिक पातळीवर विविध शक्तिकेंद्रे निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत नेतृत्वाकडून सर्वांना समान न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाल्यास असंतोष वाढणे स्वाभाविक ठरते. फुटीर गट अजूनही ममता यांना नेत्या मानत असला, तरी त्यांच्यामागे आता सुमारे वीसच आमदार आणि आठ ते दहा खासदार उरल्याने त्यांचा गट अल्पमतात आला आहे.

‘उतरती कळा’ हा शब्द वापरताना सावधगिरी आवश्यक आहे. कारण एखादा पक्ष काही अडचणींचा सामना करत असला, तरी राजकीयदृष्ट्या संपुष्टात येत आहे, असे मानणे चुकीचे ठरू शकते. तरीही काही संकेत दुर्लक्षित करता येणार नाहीत. दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर सत्ताविरोधी भावना निर्माण होणे हे लोकशाहीचे स्वाभाविक वैशिष्ट्य आहे. प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचाराचे आरोप, स्थानिक पातळीवरील नाराजी आणि रोजगारासारख्या प्रश्नांवरील असमाधान यांचा परिणाम सत्ताधारी पक्षावर होत असतो. तृणमूल काँग्रेसलाही या समस्यांचा सामना करावा लागत आहे. एके काळी परिवर्तनाचे प्रतीक असलेला पक्ष सत्तास्थापित व्यवस्थेचा भाग बनल्यामुळे विरोधकांना सरकारविरोधी वातावरण निर्माण करण्यासाठी अधिक संधी मिळाली. याशिवाय, भाजपने गेल्या दशकात बंगालमध्ये स्वतःचा प्रभाव लक्षणीयरीत्या वाढवला आहे. एकेकाळी नगण्य उपस्थिती असलेला पक्ष आज सत्तेत आला आहे. मोठ्या प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडल्यावर अनेकदा नवीन पक्ष किंवा नवीन राजकीय आघाड्या जन्माला येतात. पश्चिम बंगालमध्येही अशी शक्यता नाकारता येत नाही. तृणमूल काँग्रेस हा केवळ पश्चिम बंगालपुरता मर्यादित पक्ष नाही. राष्ट्रीय पातळीवर विरोधी राजकारणात त्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. संसदेत पक्षाचे प्रतिनिधित्व, विविध राष्ट्रीय मुद्द्यांवरील भूमिका आणि केंद्र सरकारविरोधी राजकीय आघाड्यांमधील सहभाग यामुळे तृणमूलचे महत्त्व वाढले आहे; परंतु आता पक्षात उभी फूट पडल्यामुळे राष्ट्रीय विरोधी राजकारणावर त्याचा परिणाम होऊ शकतो. विशेषतः भाजपविरोधी व्यापक आघाडी उभारण्याच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचा घटक दुर्बल होईल.

दुसरीकडे, काँग्रेससाठी ही संधी असू शकते. पश्चिम बंगालमध्ये अनेक वर्षांपासून आपला गमावलेला राजकीय प्रभाव परत मिळवण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील आहे. तृणमूल काँग्रेसची ताकद कमी झाली, तर काँग्रेसला काही प्रमाणात राजकीय अवकाश मिळू शकतो. तसेच प्रादेशिक पक्षांच्या राजकारणावरही याचा परिणाम होईल. कारण तृणमूल काँग्रेस अनेक प्रादेशिक पक्षांसाठी एक यशस्वी मॉडेल मानला जात होता. त्या मॉडेलमध्येच अंतर्गत अस्थिरता दिसू लागली, तर इतर प्रादेशिक पक्षांनाही संघटनात्मक पुनर्रचना करण्याची गरज भासेल. म्हणूनच ममता बॅनर्जी यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान विरोधक नाहीत, तर पक्षाची अंतर्गत एकजूट टिकवून ठेवणे हे आहे. कोणत्याही पक्षाचे दीर्घकालीन यश केवळ करिष्माई नेतृत्वावर अवलंबून राहत नाही. मजबूत संघटना, सक्षम नेतृत्वाची दुसरी फळी आणि संस्थात्मक निर्णयप्रक्रिया हे तितकेच महत्त्वाचे घटक असतात. ममतांनी आपल्या पक्षात संवादाची प्रक्रिया अधिक व्यापक केली, विविध नेत्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी केले आणि उत्तराधिकाराबाबतची अनिश्चितता दूर केली, तर प्रतिमा बदलू शकते. अन्यथा, असंतोषाचे रूपांतर संघटनात्मक आव्हानांमध्ये होण्याची शक्यता वाढेल. अंतर्गत मतभेद, नेतृत्वाचे केंद्रीकरण आणि वाढती राजकीय स्पर्धा यांचा योग्य वेळी सामना केला नाही, तर मजबूत वाटणारे किल्लेही ढासळू शकतात. पश्चिम बंगालसमोरील खरा प्रश्न तृणमूल काँग्रेसमध्ये फुटीचा नाही, तर बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अपेक्षांशी हा पक्ष स्वतःला कितपत जुळवून घेऊ शकतो, हा आहे. त्याचे उत्तरच ममतांच्या नेतृत्वाचे आणि तृणमूल काँग्रेसच्या भवितव्याचे मोजमाप ठरणार आहे.

पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासामध्ये अवघ्या दीड दशकापूर्वी, म्हणजेच २०११ मध्ये, ज्या डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या अभेद्य किल्ल्याला सुरुंग लावून ममता बॅनर्जी यांनी परिवर्तन घडवून आणले होते, त्याच तृणमूल काँग्रेसला आज अस्तित्वाच्या सर्वात मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. बंगालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये तृणमूल काँग्रेसचा पराभव होऊन भाजपचे सुवेंदू अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या गादीवर बसल्यानंतर महिन्याभरातच तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत घडले, हुबेहूब तोच महाराष्ट्र पॅटर्न आता कोलकात्याच्या गल्लीबोळात आणि विधानसभेत यशस्वीपणे राबवला गेला आहे. तृणमूलच्या ८० पैकी सुमारे ५८ आमदारांनी आणि २९ पैकी सुमारे वीस खासदारांनी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांचे नेतृत्व नाकारत, हकालपट्टी झालेले नेते ऋतब्रत बॅनर्जी आणि काकोली घोष यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. विधानसभेच्या अध्यक्षांनी या बंडखोर गटाला मान्यता देऊन ऋतब्रत बॅनर्जी यांची नवे विरोधी पक्षनेते म्हणून निवड केली. अवघ्या १५ वर्षांमध्ये सत्तेच्या शिखरावरून विरोधी बाकांवर आणि तिथून थेट पक्षाच्या विभाजनापर्यंत पोहोचलेली तृणमूलची ही घसरण केवळ एका प्रादेशिक पक्षाची पडझड नाही, तर ती भारतीय राजकारणातील विशिष्ट कार्यशैलीच्या मर्यादा स्पष्ट करणारी घटना आहे.

✦✦✦

# स्वरूप बदलले ; आत्मा हरवायला नको!

**फिफा विश्वचषकाकडे आता केवळ एक क्रिडाप्रकार म्हणून पाहिले जात नाही. फुटबॉलचा प्रसार आणि नव्या बाजारपेठा निर्माण करणे हे आज त्याचे प्रमुख उद्दिष्ट बनले आहे. तथापि, या विस्तारामुळे स्पर्धेची गुणवत्ता कमी होईल का, सामन्यांची संख्या अकारण वाढेल का, असे प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. जागतिक फुटबॉल विश्वचषक स्पर्धेनिमित्त घेतलेला वेध.**

खास बात

महेश जोशी

जगात सर्वाधिक चाहते लाभलेला आणि सर्वाधिक देशांमध्ये खेळला जाणारा क्रिडाप्रकार म्हणजे फुटबॉल. या क्रिडाप्रकाराचा महाकुंभ म्हणजे विश्वचषक स्पर्धा. अमेरिकेत सुरू असलेल्या ‘फिफा विश्वचषक २०२६’ या स्पर्धेकडे जगातले सगळे पुटबॉलप्रमी डोळे लावून बसले आहेत. त्याचबरोबर या ‘संधी’चे सोने करून घेण्यासाठी कॉर्पोरेट जगतात विशेषत: उत्पादनांचे मार्केटिंग करणाऱ्या कंपन्यांमध्ये अहमहमिका सुरू झाली आहे. किंबहुना, गेली दोन तीन वर्षे ‘या विश्वचषकाचा कसा फायदा करून घेता येईल’, या संदर्भात ‘बोर्डरूम मीटिंग्ज’मध्ये खलबते सुरू आहेत. फुटबॉल विश्वचषक आता केवळ क्रीडा स्पर्धा राहिलेली नसून जागतिक अर्थकारण, प्रसारमाध्यमे, तंत्रज्ञान, राजकारण आणि सांस्कृतिक प्रभाव यांचा प्रभावी संगम बनली आहे. पूर्वी राष्ट्रीय अस्मिता, खेळाडूंचे कौशल्य आणि सामन्यांतील थरार यापुरता मर्यादित असलेला हा सोहळा आता बहुआयामी रूप धारण करून उभा आहे. स्पर्धेची बदलती रचना, तिच्याशी जोडली गेलेली प्रचंड आर्थिक उलाढाल आणि नव्या दमाच्या खेळाडूंचे आगमन यामुळे जागतिक फुटबॉल एका नव्या युगात प्रवेश करताना दिसत आहे. १९३० मध्ये सुरू झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या



प्रवासात अनेक महत्त्वाचे टप्पे आले. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात दोन विश्वचषक स्पर्धा आयोजित केल्या गेल्या नाहीत. सुरुवातीला सहभागी संघांची संख्या कमी होती आणि प्रसारणाच्या मर्यादित साधनांमुळे प्रेक्षकवर्गही मर्यादित राहिला. मात्र गेल्या काही काळात दूरचित्रवाणी, उपग्रह यंत्रणा, इंटरनेट, डिजिटल स्ट्रीमिंग आणि ‘सोशल मीडिया’च्या झपाट्याने वाढलेल्या प्रभावामुळे विश्वचषक जागतिक मनोरंजन उद्योगाचा अविभाज्य घटक बनला आहे. आज प्रत्येक सामना केवळ मैदानावरच नव्हे, तर डिजिटल माध्यमे, जाहिरात क्षेत्र आणि विविध ऑनलाइन मोहिमांमधूनही लढवला जातो. अलीकडच्या काळात स्पर्धेच्या स्वरूपातही लक्षणीय बदल झाले आहेत. पारंपरिक ३२ संघांच्या चौकटीऐवजी आगामी विश्वचषकात ४८ संघांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे अधिक देशांना जागतिक व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध होईल. विशेषतः आशिया, आफ्रिका आणि उत्तर अमेरिकेतील उदयोन्मुख फुटबॉल राष्ट्रांसाठी हा बदल महत्त्वाचा आणि स्वागतार्ह मानला जात आहे.

फुटबॉलचा प्रसार वाढवणे आणि नव्या बाजारपेठा निर्माण करणे हे आज प्रमुख उद्दिष्ट बनले आहे. तथापि, या विस्तारामुळे स्पर्धेची गुणवत्ता कमी होईल का, सामन्यांची संख्या अकारण वाढेल का, असे प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. फुटबॉलच्या जागतिकीकरणामध्ये आर्थिक घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विश्वचषकाच्या आयोजनासाठी यजमान देश अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करतात. आधुनिक स्टेडियम, वाहतूक व्यवस्था, पर्यटन सुविधा आणि सुरक्षा यंत्रणा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. या खर्चामागे केवळ क्रीडा विकास नसून देशाची प्रतिमा उंचावणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि पर्यटनाला चालना देणे हे उद्देश असतात. त्यामुळे विश्वचषक हे अनेकदा ‘स्पोर्टस डिप्लोमसी’चे प्रभावी साधन ठरते. आज विश्वचषकाभोवती फिरणारी आर्थिक उलाढाल प्रचंड आहे. प्रसारण हक्क, प्रायोजकत्व करार, तिकीट विक्री, पर्यटन, स्मृतिचिन्हांची विक्री आणि डिजिटल माध्यमांवरील जाहिराती यांमधून अब्जावधी डॉलरची कमाई होते. जागतिक कंपन्या या स्पर्धेशी जोडल्या जाण्यासाठी मोठमोठे करार करतात. कारण फूटबॉल विश्वचषक ही जगातील सर्वाधिक प्रेक्षकसंख्या असलेल्या स्पर्धांपैकी एक आहे. एखाद्या ब्रँडला काही सेकंदांची जाहिरात मिळणेदेखील कोट्यवधींच्या व्यवहारात रूपांतरित होते.

‘सोशल मीडिया’च्या युगात आर्थिक समीकरणे आणखी बदलली आहेत. पूर्वी प्रसारण संस्थाच प्रमुख कमाईचे साधन होत्या. आज डिजिटल प्लॅटफॉर्म, ऑनलाइन स्ट्रीमिंग सेवा आणि सामाजिक माध्यमे ही नव्या उत्पन्नाची केंद्रे बनली आहेत. खेळाडू स्वतःही जागतिक ब्रँड झाले आहेत. त्यांच्या एका पोस्टमुळे लाखो डॉलर्सचे व्यावसायिक व्यवहार घडू शकतात. अशा परिस्थितीत विश्वचषक हा केवळ संघांचा संघर्ष न राहता जागतिक ब्रँड्सच्या स्पर्धेचेही व्यासपीठ बनला आहे. या बदलांमध्ये तंत्रज्ञानानेही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ‘व्हिडीओ असिस्टंट रेफरी’ (व्हीएआर), गोल-लाइन तंत्रज्ञान, प्रगत सांख्यिकी विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डेटा प्रणाली यांमुळे खेळ अधिक अचूक आणि व्यावसायिक बनला आहे. संघ आता केवळ सरावावर अवलंबून राहत नाहीत, तर खेळाडूंच्या हालचालींपासून त्यांच्या शारीरिक क्षमतेपर्यंत सर्व गोष्टींचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. त्यामुळे खेळाचा दर्जा उंचावला असला, तरी काहीजणांच्या मते फुटबॉलमधील सहजता आणि मानवी घटक कमी होत आहेत. विश्वचषकाच्या बदलत्या स्वरूपातील सर्वात सकारात्मक पैलू म्हणजे नव्या खेळाडूंना मिळणारी संधी. पूर्वी फुटबॉलचे केंद्र प्रामुख्याने युरोप आणि दक्षिण अमेरिका होते. आज आफ्रिका, आशिया आणि उत्तर अमेरिकेतील खेळाडूदेखील जागतिक पातळीवर चमकत आहेत. आधुनिक स्काऊटिंग नेटवर्क, आंतरराष्ट्रीय अकादमी आणि डिजिटल विश्लेषणामुळे प्रतिभावान खेळाडू दुर्गम भागांतूनही समोर येत आहेत.




नव्या पिढीतील खेळाडूंनी फुटबॉलच्या शैलीतही बदल घडवले आहेत. वेग, फिटनेस, बहुआयामी कौशल्य आणि तांत्रिक प्रावीण्य यांना पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आजचा खेळाडू केवळ एका स्थानावर खेळणारा नसून अनेक भूमिका पार पाडण्यास सक्षम असतो. प्रशिक्षकांची रणनीती, डेटा-आधारित नियोजन आणि उच्च दर्जाची वैद्यकीय सुविधा यांमुळे खेळाडूंची क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित होत आहे. युवा खेळाडूंच्या उदयामुळे फुटबॉलमध्ये नवीन कथा निर्माण होत आहेत. काही दशकांपूर्वी विशिष्ट देशांचे वर्चस्व मान्य केले जात असे; परंतु आता तुलनेने लहान देशदेखील बलाढ्य संघांना आव्हान देताना दिसतात. यामुळे स्पर्धेची अनिश्चितता आणि आकर्षण वाढले आहे. प्रत्येक विश्वचषकात एखादा नवा तारा उदयास येतो आणि जगभरातील चाहत्यांच्या चर्चेचा विषय बनतो. हीच विश्वचषकाची खरी ताकद आहे. तथापि, या सर्व सकारात्मक घडामोडींसोबत काही गंभीर प्रश्नही उपस्थित होत आहेत. वाढत्या व्यावसायिकीकरणामुळे खेळाचा आत्मा धोक्यात येत असल्याची टीका केली जाते. आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली देश आणि क्लब यांना अधिक सुविधा उपलब्ध असल्याने स्पर्धात्मक समतोल बिघडू शकतो. अनेक वेळा यजमान देशांमधील कामगार हक्क, पर्यावरणीय परिणाम आणि सार्वजनिक खर्च यांसंदर्भात वाद निर्माण होतात. त्यामुळे विश्वचषकाच्या यशाचे मूल्यांकन केवळ आर्थिक आकडेवारीवर न करता सामाजिक आणि नैतिक निकषांवरही करणे आवश्यक आहे.

खेळाडूंवरील वाढता ताण हादेखील चिंतेचा विषय आहे. वर्षभर विविध लीग, खंडीय स्पर्धा आणि राष्ट्रीय संघांच्या सामन्यांमध्ये सहभागी होत असताना खेळाडूंना पुरेसा विश्रांतीकाल मिळत नाही. विश्वचषकाचा विस्तार आणि वाढती स्पर्धात्मकता यामुळे हा ताण आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे खेळाडूंच्या आरोग्याचा प्रश्न भविष्यात अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. महिला फुटबॉलच्या वाढत्या लोकप्रियतेमुळेही विश्वचषकाच्या संकल्पनेत व्यापक बदल होत आहेत. महिला विश्वचषकाला मिळणारा प्रतिसाद, वाढती प्रायोजकता आणि माध्यमांचे लक्ष यांमुळे फुटबॉल अधिक सर्वसमावेशक बनत आहे. हे बदल क्रीडाक्षेत्रातील लिंगसमानतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहेत. एकूणच पाहता, जागतिक फुटबॉल विश्वचषक आज परिवर्तनाच्या निर्णायक टप्प्यावर उभा आहे. स्पर्धेचे विस्तारित स्वरूप, वाढती आर्थिक उलाढाल, तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि नव्या खेळाडूंचा उदय यांमुळे फुटबॉलचे स्वरूप पूर्वीपेक्षा अधिक व्यापक आणि प्रभावशाली बनले आहे; परंतु या विस्तारासोबतच खेळातील गुणवत्ता, नैतिकता आणि समावेशकता यांचे संतुलन राखणे आवश्यक आहे. विश्वचषकाचे खरे यश केवळ कमाईच्या आकड्यांमध्ये किंवा प्रेक्षकसंख्येत मोजता येणार नाही. ते मोजले जाईल नव्या प्रतिभांना मिळालेल्या संधींमध्ये, विविध संस्कृतींना जोडणाऱ्या भावनेत आणि जगभरातील कोट्यवधी चाहत्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रेरणेत. बदलत्या काळानुसार विश्वचषकाचे स्वरूप निश्चितच बदलत राहील; मात्र खेळातील उत्कटता, स्पर्धेची रोमांचकता आणि जागतिक एकात्मतेचा संदेश हे शाश्वत मूल्य कायम राहील. फुटबॉलच्या या महाकुंभाचे भविष्य त्यामुळे केवळ उज्ज्वलच नव्हे, तर अधिक व्यापक आणि प्रभावी दिसते.

✦✦✦

# पर्यावरणरक्षणाची नवी दिशा

**पर्यावरण**

**मधुरा कुलकर्णी**

**हवामानबदल हा केवळ तापमानवाढीचा प्रश्न नाही, तर ती परिसंस्थांच्या सहनशक्तीची कसोटी आहे. जंगलांसाठी हा निर्णायक टप्पा आहे. प्रश्न असा आहे, की जंगलांमध्ये आधीपासून असलेले घटक, प्रजातींची विविधता आणि जैविक रचना या सर्वांचा एकत्रित परिणाम हवामानबदलाच्या वास्तवाला तोंड देण्यासाठी पुरेसा ठरेल का? याबाबत मानवाची भूमिका काय असायला हवी?**

'ग्लोबल चेंज बायॉलॉजी'मध्ये अलीकडे एक संशोधन प्रसिद्ध झाले. हवामानबदलाच्या झपाट्याने बदलणाऱ्या वास्तवाला सामोरे जाण्यास जंगलातील गुणधर्म, प्रजातींची विविधता, जैविक रचना पुरेशी आहे का, या प्रश्नाचा सखोल अभ्यास हे संशोधन करते. 'युनिर्व्हसिटी ऑफ कॅलिफोर्निया', 'सांता बार्बारा' आणि 'युनिर्व्हसिटी ऑफ उताह'मधील संशोधकांनी वन परिसंस्थेतील



यापुढे वेगाने होणारे हवामानबदल जंगले सहन करू शकतील?

जैविक गुणधर्म, पानांची रचना, झायलमचे कार्य, जलवाहिन्यांची क्षमता आणि प्रजातींची रचना यांचा अभ्यास केला. हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर जंगलांची प्रतिक्रिया समजून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा केलेल्या अभ्यासातून दिसून आले, की बहुसंख्य जंगलांमध्ये उष्ण आणि कोरड्या परिस्थितींशी जुळवून घेण्याची क्षमता काही प्रमाणात आहे. झाडे त्यांच्या पानांच्या आकारात, घनतेत आणि रंध्रांच्या कार्यात बदल करू शकतात. वाढलेल्या कार्बन डायऑक्साइडच्या पार्श्वभूमीवर काही झाडे कमी पाणी गमावत प्रकाश संश्लेषण करू शकतात. परिसंस्थेत आधीपासून अस्तित्वात असलेल्या दुष्काळ-सहनशील प्रजाती अधिक प्रभावी होऊ शकतात. अमेरिकेतील जवळपास ८८ टक्के जंगलांमध्ये अशा प्रकारची रचनात्मक आणि प्रजाती-आधारित विविधता आढळते. ती पोषक आहे. याचा अर्थ असा, की निसर्ग पूर्णपणे असहाय नाही. जितकी विविधता अधिक, तितकी बदल सहन करण्याची शक्यता जास्त; पण येथेच सर्वात मोठी चिंता उभी राहते. जंगले बदलत आहेत; पण हवामान ज्या वेगाने बदलत आहे, त्या वेगाशी जंगलांची जैविक प्रतिक्रिया जुळत नाही. हा एक महत्वाचा प्रश्न बनतो आहे. त्याचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे.

उत्क्रांती हा दीर्घकालीन आणि संथ प्रक्रियेचा भाग आहे. शेकडो वर्षे जगणाऱ्या वृक्षांसाठी पुढील काही दशकांमध्ये होणारे हवामानबदल अत्यंत वेगवान असणार आहेत. दुष्काळाची तीव्रता वाढत असताना, पाण्याच्या कमतरतेमुळे निर्माण होणारा ताण झाडांच्या मृत्यूदरात वाढ करू शकतो. काही प्रजाती नष्ट होऊ शकतात आणि त्या जागी अधिक कठीण, कोरड्या हवामानाशी सुसंगत प्रजाती येऊ शकतात. आज वने मानवनिर्मित कार्बन उत्सर्जनापैकी सुमारे ३० टक्के कार्बन शोषून घेतात. जंगलांची संरचना बदलली आणि त्यांची वाढ आणि स्थैर्य कमी झाले, तर ही क्षमता घटू शकते. म्हणजेच, हवामानबदलामुळे जंगलांची कार्बन शोषणक्षमता कमी होईल आणि त्यामुळे हवामानबदल आणखी वेगाने वाढेल. हे एक दुष्टचक्र आहे. दुसरीकडे, 'युनिर्व्हसिटी ऑफ क्वीन्सलँड'च्या संशोधनानुसार उष्ण कटिबंधीय वर्षावनांपैकी सुमारे २५ टक्केच उच-गुणवत्तेची, घनदाट आणि कमी मानवी हस्तक्षेप असलेली वने उरली आहेत. हा निष्कर्ष 'प्रोसेडिंग ऑफ दि नॅशनल अॅकॅडमी ऑफ सायन्स'मध्ये प्रसिद्ध झाला आहे. म्हणजेच, केवळ जंगलांचे क्षेत्र टिकून आहे म्हणून समाधान मानता येणार नाही. त्यांची रचनात्मक गुणवत्ता आणि अखंडता अधिक महत्त्वाची आहे. संकटग्रस्त प्रजातींसाठी आवश्यक असलेले घनदाट अधिवास झपाट्याने कमी होत आहेत. जंगलांमध्ये काही प्रमाणात स्वाभाविक अनुकूलनशक्ती आहे, हे नाकारता येत नाही; पण ती पुरेशी ठरेल का? उत्तर सरळ 'हो' किंवा 'नाही' असे नाही.

मानवनिर्मित दबाव, जंगलतोड, अधिवास विखंडन, प्रदूषण यात कपात झाली आणि हवामानबदलावर तातडीने नियंत्रण ठेवले गेले, तर जंगलांची अंतर्गत जैविक शक्ती त्यांना वाचवू शकते; पण सध्याची गती कायम राहिल्यास जंगलांची अनुकूलन क्षमता अपुरी पडू शकते, म्हणूनच धोरणात्मक पातळीवर काही मूलभूत बदल आवश्यक आहेत. दुष्काळ सहन करू शकणाऱ्या स्थानिक प्रजातींना प्राधान्य देणारी लागवड अधिवासांची अखंडता जपणे, मानवनिर्मित व्यत्यय कमी करणे, हरितगृह वायू उत्सर्जनात लक्षणीय घट आदी उपाय योजायला हवेत. जंगलांमध्ये हवामानबदलाशी जुळवून घेण्याची बीजे नक्कीच आहेत; पण त्या बीजांना वाढण्यासाठी योग्य पर्यावरण, वेळ आणि संरक्षणाची आवश्यकता आहे. अन्यथा, ही क्षमता केवळ संभाव्यता राहील, प्रत्यक्ष संरक्षण नव्हे. जंगलांचे भविष्य त्यांच्या अंतर्गत गुणधर्मांवर जितके अवलंबून आहे, तितकेच आपल्या राजकीय इच्छाशक्तीवर आणि सामूहिक कृतीवर अवलंबून आहे. प्रश्न जंगलांच्या क्षमतेचा नाही; प्रश्न आपण त्या क्षमतेला साथ देतो का याचा आहे. जगभरातील जंगलांसाठी कठीण काळ येऊ घातला आहे. हवामानबदलामुळे संपूर्ण जगात तापमान वाढत आहे आणि आर्द्रतेची पातळी घटत आहे. दुष्काळाचा जंगलांवर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी संशोधकांनी वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञांनी संकलित केलेली आकडेवारी गणितीय मॉडेलशी जोडली. अभ्यासाच्या निष्कर्षांनुसार बहुतेक जंगलांमध्ये उष्ण आणि कोरड्या परिस्थितींशी जुळवून घेण्याची क्षमता आहे; पण या तणावापासून बचाव करण्यासाठी ते पुरेशा वेगाने बदलत नाहीत.

हवामानबदलामुळे वाढणाऱ्या पाण्याच्या कमतरतेच्या तणावापासून बचाव करण्यासाठी जंगल पुरेशा वेगाने बदलत नसल्याचे पाहून संशोधक चिंतित झाले. जगातील बहुतेक जंगलांमध्ये प्रजातींच्या संरचनेतील बदलांच्या माध्यमातून दुष्काळ सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची भिन्नता आढळते. प्रत्येक झाड आपल्या क्रियाकलापांमध्ये, शरीरक्रियेमध्ये आणि जनुक अभिव्यक्तीत नव्या परिस्थितीनुसार बदल करू शकते. अमेरिकेतील वनस्थितीच्या डेटाबेसमध्ये झाडांचे स्थान, प्रजाती, आकार, घनता आणि आरोग्य तसेच त्यांची वाढ, मृत्यूदर आणि तोड यांची नोंद असलेली वन यादी समाविष्ट आहे. संशोधकांनी 'झायलम फंक्शनल ट्रेट्स' डेटाबेसमधील आकडेही वापरले. त्यात झाडांच्या शरीरक्रिया आणि जलवाहिनीसंबंधी गुणधर्मांचे मोजमाप संकलित केले जाते आणि हा डेटाबेस 'फॉरेस्ट इन्व्हेंटरी'शी जोडला जातो. पाण्याच्या वाढत्या कमतरतेच्या तणावाला जंगल कसे प्रतिसाद देतात, याचे अनुकरण करणारे एक मॉडेल टीमने विकसित केले. हे मॉडेल प्रकाश संश्लेषणाबरोबरच वनस्पतीवरील तणावाचे भाकीत करते. पानांमधील बदल पर्यावरणीय परिस्थितींमधील बदलांमुळे निर्माण होणारा तणाव कसा भरून काढू शकतो हे पाहण्यासाठी त्यांनी एक अनुकूलन तंत्रही समाविष्ट केले. अभ्यासानुसार आतापर्यंतच्या सर्व आकडेवारीवरून असे दिसते, की पाण्याअभावी तणाव व्यवस्थापित करण्यासाठी प्रत्येक झाडासाठी पान हे सर्वात मोठे साधन आहे.

कोरड्या प्रदेशांमध्ये झाडांची पाने कातरदार किंवा कमी असतात, तर ओलसर प्रदेशांमध्ये झाडे दाट पाने धारण करू शकतात. संशोधकांना आढळले, की जगभरात अनेक जंगलांमध्ये अनुकूलनाची क्षमता आहे. मॉडेलनुसार अमेरिकेतील ८८ टक्के जंगलांमध्ये हवामानबदलाशी जुळवून घेण्यास मदत करणारे गुणधर्म आणि प्रजातीवैविध्य आहे. तथापि, बहुतेक झाडे मॉडेलने भाकीत केलेल्या वेगाने जुळवून घेत नाहीत. त्यामुळे त्यांचे नष्ट होण्याचे प्रमाण जास्त आहे. वनस्पती ज्या रंध्रांद्वारे कार्बन डायॉक्साइड घेतात, त्याच रंध्रांद्वारे पाणी गमावतात. त्यामुळे वातावरणात अधिक कार्बन डायॉक्साईड असल्यास वनस्पती या रंध्रांचा आकार कमी करूनही प्रकाश संश्लेषणासाठी आवश्यक कार्बन मिळवू शकतात. यामुळे पानांतून बाहेर जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होते. संशोधकांच्या मते उष्ण हवामानात वातावरण अधिक कोरडे असते. त्यामुळे पाने अधिक पाणी गमावतात. ही अनिश्चितता आणि परस्परभरपाई करणाऱ्या घटकांनी युक्त अशी गुंतागुंतीची प्रणाली आहे. त्याचे निराकरण करण्यासाठी सूक्ष्म मॉडेलची गरज आहे. जंगले आधीच बदलू लागली आहेत. वातावरण अधिक कोरडे होत जाईल, तशी दाट जंगले कमी होतील. जंगलांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या अस्तित्वात असलेल्या प्रजातींचे वेगळे मिश्रण आढळू शकते. हे सर्व घटक वन कार्बन साठ्यावरही परिणाम करतात. एका नव्या संशोधनानुसार जगभरातील उष्णकटिबंधीय वर्षावनांपैकी एक चतुर्थांशाहूनही कमी जंगलांमध्ये हजारो संकटग्रस्त प्रजाती विलुप्त होण्याच्या उंबरठ्यावर आहेत.

संशोधनानुसार 'रिमोट सेन्सिंग' तंत्राचा वापर करून जंगलांवर अवलंबून असलेल्या कशेरुकी प्रजातींच्या वितरण क्षेत्रांमध्ये वर्षावनांची गुणवत्ता विश्लेषित करण्यात आली. ९० टक्क्यांपर्यंत जंगल या प्रजातींच्या क्षेत्रात अद्याप अस्तित्वात आहे; पण त्यापैकी केवळ २५ टक्के भागच उच्च गुणवत्तेचा आहे. तो विलुप्त होण्याचा धोका कमी करण्यासाठी आवश्यक आहे. घनदाट वर्षावने जैवविविधतेसाठी अत्यावश्यक आहेत; पण ही महत्त्वाची जंगले किती प्रमाणात कमी झाली आहेत, हे पूर्वी स्पष्ट झाले नव्हते. क्वीन्सलँडच्या ओलसर उष्णकटिबंधीय प्रदेशात आढळणाऱ्या 'गोल्डन बोवरबर्ड'ची घटती संख्या म्हणून वर्गीकृत केले गेले आहे. त्याच्या ८४ टक्के अधिवास शिल्लक असला, तरी त्यापैकी फक्त ३६ टक्के भाग घनदाट वर्षावनाचा आहे. जैवविविधतेसाठी मानवनिर्मित व्यत्यय कमी करणे तितकेच आवश्यक आहे. एकंदरीत, पुढील हानी टाळण्यासाठी सर्वाधिक घनदाट वर्षावनांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे.

✦✦✦

# कहाणी दुखऱ्या वेलींची

**त्या दोघींच्या बोलण्यातून जे जग समोर आलं, ते मी ना कधी पुस्तकात वाचलं होतं, ना पाहिलं होतं. मी उठलो आणि गाडीकडे चालायला लागलो तेव्हा त्या दोघी अर्धवट वाळलेल्या कपड्यांवर दगड ठेवत होत्या, ते कपडे वाऱ्यावर उडून जाऊ नयेत म्हणून. पण समाजाने त्यांच्यावर केलेले आरोप, त्यांची कुचंबणा, त्याला थोपवायला त्यांच्याकडे कोणताच उपाय नव्हता. राधिका आणि नंदा ह्या दोन्हीही दुखऱ्या वेली आहेत.**

**भ्रमंती लाईव्ह स्टोरी**



**संदीप काळे**
sandip98868@gmail.com
9890098868

(उत्तरार्ध)

राधिकाचं व्यावहारिक कौशल्य फारसं शिक्षण नसतानाही अफाट आहे. बाजारपेठेचं ज्ञान, पाहुणचार, आलं गेलं, सोयरेधायरे, घरचे मानपान हे सगळं तिला सहज जमतं. व्यवहारातले चढउतार, नात्यांमधल्या अडचणींवर मात करण्याची प्रक्रिया यामध्ये ती माहीर आहे. पण राधिका आई बनू शकली नाही, म्हणूनच तिच्यावर गणगोतात टीका होत राहिली.

खूप वेळ गप्पा झाल्यावर राधिका खुलून बोलायला लागली. ती म्हणाली,

'आता राधिका ऐवजी 'वांझोटी' हा शब्द कानाला सवयीचा झालाय. त्याचं मला काही वाटत नाही. मी स्वतःहून वांझोटी झाले का? मला मूल होऊ नये, यासाठी मी काही केलंय का? नाही ना? मग समाजातल्या बोलण्याकडं मी लक्ष का द्यायचं?'

या जेमतेम शिक्षण असलेल्या बाईमध्ये इतका आत्मविश्वास आणि स्पष्टता कुठून आली असेल, हा विचार मला छळू लागला.

राधिकाचं आपल्या नवऱ्यावर अफाट प्रेम होतं. पण दुसरी बायको आल्यापासून त्याचं प्रेम आटून गेलं होतं.

ती म्हणाली, 'समाजाचं काय... काहीही बोलतो. पण तो (नवरा) आजही सगळी जबाबदारी माझ्यावर टाकून मोकळा.

कधीतरी प्रेमानं बघतो आणि त्या प्रेमाच्या नजरेसाठीच जगावंसं वाटतं.

त्याला दोष देण्यात काही अर्थ नाही. मी त्याचं स्वप्न पूर्ण करू शकले नाही.

तरी त्यांनी मला सांभाळलं, हे काय कमी आहे?'

मी आणि राधिका बोलत असताना आणखी एक बाई तिथे आली. ती म्हणाली,

'आला का भाऊ तुला न्यायला? तुझं बरं आहे गं. जवा वाटलं तवा भावाला बोलवतीस'.

राधिका हसून म्हणाली,

'हा माझा सख्खा भाऊ नाही. रस्त्यानं जाणारे दादा हायीत. त्यांनी पाण्यात वाहत जाणारं माझं टोपलं काढून दिलं. मग सुकादुकाच्या गप्पा झाल्या. जेवण झालं, बस इतकंच!'

ती दुसरी आलेली बाई माझ्या चमचमणाऱ्या बुटांकडे, पोशाखाकडे आणि गाडीकडे पाहत होती. तिच्या चेहऱ्यावर विचित्र अचंबा होता.

मी त्या दोघींच्या शेजारी दगडावर बसलो होतो. हातात भाकरी आणि गप्पा सुरू, हे बघून तिला आश्चर्य वाटलं.

ती बाईही आमच्या गप्पांमध्ये सामील झाली. तिचं नाव नंदा.

नंदाला पाच मुली आहेत. सहाव्यांदा गरोदर आहे. नवऱ्याला 'मुलगाच' हवा आहे.

मुलगा म्हणजे वंशाचा दिवा. मुलगी म्हणजे परक्याचं धन, अशा विचारानं नंदाचं सगळं कुटुंब झपाटलेलं आहे.

मी नंदाला विचारलं, 'घरी वातावरण कसं आहे?'

ती म्हणाली, 'काय वातावरण? राबराब राबायचं अन् मुलगा होत नाही, म्हणून रोज शिव्या खायच्या. माझी आई जिवंत होती, तवा तिला समदं सांगायचं. आता तीही नाही. वडील लहानपणीच गेले. भावाकडून काही आधार नाही.

ती म्हणाली, 'पाच गर्भ पाडले. सगळे मुलीचेच. तीन-चार वैद्य म्हणाले, यांना मुलगा होणारच नाही. तरीही सासू-सासरे ऐकत नाहीत. डॉक्टर म्हणतात, 'असं केलं, तर बाई वाचल कशी?'

एकीकडे राधिका तिचं दुःख सांगत होती, तर दुसरीकडे नंदा. जिवंत असूनही ती रोज कसे मरण अनुभवते, हे मला सांगत होती.

राधिका म्हणाली, 'आता जगणं फक्त नवऱ्याच्या त्या एका नजरेसाठी असतं. तो कधीतरी एक प्रेमळ नजर टाकतो. माझा नवरा आजही प्रेम करत असेल.

समाज काय... कुणालाही दोष देतो. कावळेच नुस्ते!'

नंदा पुढे म्हणाली, 'खूप वेळा वाटतं, या नदीत उडी मारावी. जीव द्यावा. पण मग मुलींचा विचार येतो. माझ्या माघारी त्यांचं कसं होईल?'



त्या दोघींच्या बोलण्यातून जे जग समोर आलं, ते मी ना कधी पुस्तकात वाचलं होतं, ना पाहिलं होतं.

दोन वेगवेगळ्या सामाजिक त्रासांमधून रोज मरत जगणाऱ्या ह्या दोन स्त्रिया, त्यांचं दुःख कोणत्याही मापात मोजता येत नाही.

मी उठलो आणि गाडीकडे चालायला लागलो. मी एकदा मागे वळून पाहिले, तेव्हा त्या दोघी अर्धवट वाळलेल्या कपड्यांवर दगड ठेवत होत्या, ते कपडे वाऱ्यावर उडून जाऊ नयेत म्हणून. पण समाजाने त्यांच्यावर केलेले आरोप, त्यांची कुचंबणा, त्याला थोपवायला त्यांच्याकडे कोणताच उपाय नव्हता. कोणतंच मनोभावे वजन नव्हतं.

राधिका आणि नंदा ह्या दोन्हीही दुखऱ्या वेली आहेत. त्यांचा कर्तृत्वाचा सुगंध दूरवर पोहोचतोय, पण आपण त्यांना आपुलकीचं पाणी घातलं नाही, तर एक दिवस ह्या वेली सुकून जातील, तो सुगंध हरवून जाईल. बरोबर आहे ना?

राधिका आणि नंदा यांच्यासारख्या दुखऱ्या वेली ग्रामीण भागात तुम्हाला पावलोपावली भेटतील. त्यांना आधार द्या. त्यांचं दुःख समजून घ्या. त्यांना जर आपण दोन क्षणाचा आनंद देऊ शकलो, तर आपण खरे 'माणूस' झालो म्हणायचं. अन्यथा काही खरं नाही!

**(लेखक 'महासागर मीडिया ग्रुप'चे मुख्य समूह संपादक आहेत.)**

✦✦✦

# धोरणांची जबाबदारी स्वीकारायची की टीका करायची?

कोणत्याही देशाच्या विकासाचा पाया शिक्षण व्यवस्थेवर उभा असतो तसा आपल्याही देशाचा आहे. पण आपल्या देशात एकसमान शिक्षण प्रणाली नसल्याने वेगवेगळ्या राज्यातच नव्हे तर एकाच राज्यातील शैक्षणिक परिस्थिती वेगवेगळी आहे. कोणत्याही राज्याची सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगती त्या राज्यातील शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील धोरणे ही दूरदृष्टी, समन्वय आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन आखली जाणे अपेक्षित असते. परंतु महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत उच्च शिक्षण क्षेत्रात सुरू असलेल्या घडामोडींकडे पाहिले असता, सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याऐवजी तिचे केंद्रीकरण, खाजगीकरण आणि दुर्बलीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची भावना शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, शिक्षक आणि शिक्षणप्रेमींमध्ये निर्माण होत आहे.

२०२० मध्ये नीती आयोगाच्या शिक्षणविषयक निर्देशांकात पंजाब राज्याचा क्रमांक २७ वा होता. मात्र २०२५ पर्यंत त्याच पंजाबने शिक्षण क्षेत्रात देशात अग्रक्रम प्राप्त केला. हा बदल केवळ योगायोग नव्हता. त्यामागे शासनकर्त्यांची सकारात्मक मानसिकता, सार्वजनिक शिक्षण संस्थांवरचा विश्वास, सातत्यपूर्ण धोरणे आणि शिक्षण क्षेत्रात केलेली गुंतवणूक हे महत्त्वाचे घटक होते.

याउलट महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रातील अनेक निर्णय आणि वक्तव्ये सार्वजनिक शिक्षण संस्थांबाबत अविश्वास निर्माण करणारी असल्याचे दिसून येत आहे. अलीकडेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुण्यातील एका खासगी विद्यापीठाच्या व्यासपीठावरून सार्वजनिक विद्यापीठांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आजपर्यंत कोणते भरीव काम केले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हे विधान केवळ एका विद्यापीठाबाबत नसून महाराष्ट्रातील संपूर्ण सार्वजनिक विद्यापीठ व्यवस्थेवर केलेला आक्षेप मानला जात आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे देशातील अग्रगण्य विद्यापीठांपैकी एक आहे. हजारो संशोधक, लाखो विद्यार्थी, शेकडो संशोधन प्रकल्प आणि अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमांमुळे या विद्यापीठाने जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पुणे शहराला विद्येचे माहेरघर म्हणून मिळालेल्या प्रतिष्ठेमागे या विद्यापीठाचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही. अशा परिस्थितीत संबंधित विद्यापीठाची कामगिरी जाणून घेण्याऐवजी सार्वजनिक मंचावर त्याच्या अस्तित्वावरच प्रश्न उपस्थित करणे हे शिक्षण क्षेत्रासाठी दुर्दैवी आहे.

आज महाराष्ट्रातील सार्वजनिक विद्यापीठे अनेक संकटांचा सामना करत आहेत. प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त आहेत. नियमित भरती प्रक्रिया ठप्प आहे. संशोधनासाठी मिळणारा निधी सातत्याने कमी होत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन प्रकल्पांसाठी आवश्यक असलेली आर्थिक मदत मर्यादित झाली आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठांनी गुणवत्ता टिकवून ठेवणे हे स्वतःमध्ये मोठे आव्हान बनले आहे.

याचबरोबर राज्य सरकारने सार्वजनिक विद्यापीठांच्या अर्थसंकल्प आणि लेखापरीक्षण प्रक्रियेचे राज्यस्तरीय केंद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठांना स्वायत्तता हा भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेचा मूलभूत आधार आहे.

स्थानिक गरजांनुसार शैक्षणिक व आर्थिक निर्णय घेण्याची मुभा विद्यापीठांना असते. मात्र अर्थसंकल्पापासून लेखापरीक्षणापर्यंत सर्व प्रक्रिया राज्य नियंत्रणाखाली आणण्याचे धोरण विद्यापीठांच्या स्वायत्ततेसाठी धोकादायक ठरू शकते.

दरम्यान, राज्यात इंटिग्रेटेड ज्युनिअर कॉलेजेस संदर्भातील वादही समोर आला आहे. विशेषतः मुंबई-पुणे परिसरात अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रत्यक्षात खासगी कोचिंग क्लासेसमध्ये चालते आणि कनिष्ठ महाविद्यालये केवळ बोर्ड परीक्षा फॉर्म भरण्यापुरती मर्यादित राहतात, हे वास्तव सर्वश्रुत आहे.

लाखो रुपयांच्या फी घेऊन गुणवत्तेची आणि निकालाची हमी देणाऱ्या या व्यवस्थेकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करण्यात आले. आता अचानक चौकशी आणि कारवाईची भूमिका घेतली जात आहे. यामुळे प्रश्न निर्माण होतो की, इतकी वर्षे ही व्यवस्था कोणाच्या आशीवार्दाने सुरू होती?

शिक्षकांना अध्यापनाऐवजी जनगणना, निवडणुका, विविध शासकीय सर्वेक्षणे आणि इतर अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविले जाते. दुसरीकडे विद्यार्थ्यांचे भविष्य खासगी कोचिंग उद्योगाच्या हाती सोपविले जाते. ही परिस्थिती शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टालाच हरताळ फासणारी आहे.

गेल्या काही वर्षांत खाजगी विद्यापीठे, क्लस्टर विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अधिक आक्रमकपणे राबविले जात आहे. अर्थात खाजगी संस्थांचा सहभाग हा शिक्षण व्यवस्थेच्या विस्तारासाठी आवश्यक असू शकतो. परंतु त्यासाठी सार्वजनिक विद्यापीठांना दुय्यम ठरविणे, त्यांची प्रतिमा मलिन करणे आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत करणे योग्य ठरू शकत नाही. कारण शिक्षण हे केवळ बाजारपेठेतील उत्पादन नसून सामाजिक न्याय आणि समान संधीचे साधन आहे.

देशातील बहुसंख्य प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ, शिक्षक, न्यायमूर्ती, राजकारणी, उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते हे सार्वजनिक विद्यापीठांमधूनच घडले आहेत. भारतीय समाजाच्या उभारणीत या विद्यापीठांचे योगदान अनन्यसाधारण आहे. आजही ग्रामीण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांतील लाखो विद्यार्थी सार्वजनिक विद्यापीठांमुळे उच्च शिक्षण घेऊ शकत आहेत.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
९३२६८७७७४९

कोरोना काळात सार्वजनिक विद्यापीठांनी समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी सिद्ध केली. अनेक विद्यापीठांनी कोविड चाचणी प्रयोगशाळा उभारल्या, संशोधनाच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्राला मदत केली, ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प सुरू केले आणि स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधन केले. काही विद्यापीठांनी व्हेंटिलेटर निर्मितीपासून ते डिजिटल शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीपर्यंत अनेक उपक्रम राबविले. त्यामुळे सार्वजनिक विद्यापीठांचे योगदान केवळ पदवी देण्यापुरते मर्यादित नसून समाजाच्या सर्वांगीण विकासाशी जोडलेले आहे.

आज आवश्यक आहे ती सार्वजनिक विद्यापीठांची निंदा नव्हे तर त्यांना बळकटी देण्याची भूमिका असली पाहिजे.

शासकीय विद्यापीठांना आवश्यक निधी द्यायचा नाही, संशोधनाची सर्व अनुदान बंद करायची, रिक्त पदांची भरती करायची नाही, संशोधनासाठी प्रोत्साहन, प्रशासकीय स्वायत्तता आणि दीर्घकालीन शैक्षणिक धोरण यांची गरज आहे. शिक्षण क्षेत्रातील समस्यांसाठी विद्यापीठांना दोष देण्यापेक्षा त्या समस्यांच्या मुळाशी असलेल्या शासकीय धोरणांचे आत्मपरीक्षण होणे अधिक आवश्यक आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री म्हणून चंद्रकांत पाटील यांच्याकडे शिक्षण क्षेत्राला दिशा देण्याची जबाबदारी आहे. हे त्यांचं अपयश शासनकर्त्यांचा अपयश, मान्य करायला तयार नाही.त्यामुळे सार्वजनिक विद्यापीठांविषयी अविश्वास व्यक्त करण्याऐवजी त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. शिक्षण व्यवस्थेचा विकास हा संघर्षातून नव्हे तर सहकार्य, विश्वास आणि दूरदृष्टीतून साध्य होतो.

पंजाब सरकारने शिक्षण क्षेत्रात केलेली झेप ही शासनाच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे शक्य झाली. महाराष्ट्राकडेही उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा, सक्षम विद्यापीठे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांची मोठी परंपरा आहे. मात्र या परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा शिक्षणाचे व्यापारीकरण वाढेल आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच मोठा धोका निर्माण होईल.

आजचा खरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्राला ज्ञानाधिष्ठित समाज घडवायचा आहे की शिक्षणाची बाजारपेठ निर्माण करायची आहे? या प्रश्नाचे उत्तर राज्याच्या शिक्षण धोरणातूनच मिळणार आहे.

शासनाने शैक्षणिक क्षेत्राबाबत इतक्या नकारार्थी भूमिका घेऊनही, इतक्या कमी निधीतही महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थिती इमानदारीने काम करणाऱ्या शिक्षक वर्गामुळे भारतातील उत्तर प्रदेश किंवा इतर राज्यापेक्षा बरीच चांगली आहे. शासनाने मुबलक निधी आणि योग्य धोरणे राबविली तर आज जगातील पहिल्या २०० विद्यापीठात भारताचे एकही विद्यापीठ नाही अशी परिस्थिती बदलून जगातील पहिल्या ५० मध्ये इथल्या विद्यापीठाचे नाव आणण्याची क्षमता इथला शिक्षक ठेवतो. या शिक्षकावर अन्याय होऊ नये याकरिता शिक्षकाचे योग्य प्रतिनिधित्व आवश्यक आहे.

---

(लेखक संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती येथे सिनेट सदस्य आहेत)

# येणारा काळ अविवाहितांचे युग ठरणार आहे का?




भारतीय समाज एका शांत पण अत्यंत गंभीर सामाजिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे. हे परिवर्तन ना एखाद्या राजकीय क्रांतीचे आहे, ना आर्थिक उलथा पालथीचे, ते आहे बदलत्या कौटुंबिक आणि वैवाहिक मूल्यांचे.

एकेकाळी आयुष्याचा अविभाज्य भाग मानला जाणारा विवाह आज अनेक तरुण-तरुणींसाठी पर्याय बनत चालला आहे. शिक्षण, करिअर, आर्थिक स्वावलंबन, शहरीकरण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्या वाढत्या प्रभावामुळे विवाहाचे वय सातत्याने पुढे ढकलले जात आहे.

काही जण विवाह न करण्याचाही निर्णय घेत आहेत. त्यामुळे एक प्रश्न आज समाजासमोर उभा ठाकला आहे, येणारा काळ अविवाहितांचे युग ठरणार आहे का? भारतीय समाजव्यवस्थेत विवाह ही केवळ दोन व्यक्तींची वैयक्तिक बाब मानली जात नाही तर तो कुटुंब, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ समजला जातो. शतकानुशतके विवाहसंस्थेने समाजाला एक दिशा दिली, नातेसंबंधांची वीण घट्ट केली आणि पुढील पिढ्यांच्या निर्मितीचा पाया घातला. मात्र आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात विवाहाबद्दलच्या संकल्पना झपाट्याने बदलताना दिसत आहेत.

आजच्या पिढीची जीवनशैली आणि विचारसरणी पूर्वीच्या पिढीपेक्षा पूर्णतः वेगळी आहे. एकेकाळी वीस ते पंचवीस वर्षांच्या वयोगटात विवाह होणे सामान्य मानले जात होते. आज मात्र अनेक तरुण-तरुणी तीस वर्षांनंतरही विवाहाचा निर्णय घेत नाहीत. काही जण करिअरमध्ये स्थिर होण्याची वाट पाहतात, काही आर्थिक स्वावलंबनाला प्राधान्य देतात, तर काहींना वैवाहिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यापेक्षा स्वतंत्र जीवन अधिक आकर्षक वाटते.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेचा हा परिणाम असला तरी त्याचे दूरगामी परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत. शिक्षण आणि करिअरच्या स्पर्धेने विवाहाला दुय्यम स्थान दिले आहे. उच्च शिक्षणासाठी अनेक तरुण-तरुणी मोठ्या शहरांत किंवा परदेशात जातात. त्यानंतर नोकरी, बढती, व्यवसाय आणि आर्थिक प्रगती यांचा पाठपुरावा करताना विवाहाचा विषय सतत मागे पडत जातो.

अनेक पालकसुद्धा आधी करिअर, मग विवाह या विचाराला प्रोत्साहन देतात. परंतु करिअरची शर्यत संपण्याचे कोणतेही निश्चित वय नसते. त्यामुळे विवाहाचा निर्णय सतत पुढे ढकलला जातो आणि नकळत आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा निघून जातो.

दुसरीकडे, आर्थिक स्वावलंबनामुळे व्यक्ती अधिक आत्मनिर्भर झाली आहे. पूर्वी कुटुंब हे आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेचे प्रमुख साधन होते. आज अनेकांना एकटे राहूनही चांगले जीवन जगणे शक्य झाले आहे. त्यामुळे विवाह ही गरज नसून एक पर्याय असल्याची मानसिकता वाढीस लागली आहे. विशेषतः शहरी भागात ही प्रवृत्ती अधिक स्पष्टपणे दिसून येते.

मात्र या बदलांचे सामाजिक परिणामही तितकेच गंभीर आहेत. विवाहाचे वय वाढल्याने जन्मदर कमी होतो. अनेक विकसित देश आज लोकसंख्या घटण्याच्या संकटाला सामोरे जात आहेत. जपान, दक्षिण कोरिया आणि इटलीसारख्या देशांमध्ये विवाहाचे प्रमाण घटले असून वृद्धांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

भारताची परिस्थिती अजून तितकी गंभीर नसली तरी महानगरांमध्ये त्याची प्रारंभिक चिन्हे दिसू लागली आहेत. लहान कुटुंबे, एकुलती एक मुले आणि वाढता एकटेपणा ही त्याची काही उदाहरणे आहेत. अविवाहित राहण्याच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे कौटुंबिक रचनेवरही परिणाम होतो.

संयुक्त कुटुंब व्यवस्था आधीच कमकुवत झाली आहे. त्यात विवाह उशिरा होणे किंवा न होणे यामुळे कुटुंबसंस्थेची परंपरागत रचना अधिकच ढासळू शकते. वृद्ध पालकांच्या आधाराचा प्रश्न निर्माण होतो. अनेक कुटुंबांत मुलगा किंवा मुलगी अविवाहित राहिल्यास पुढील पिढीची साखळीच तुटते. यामुळे सामाजिक नातेसंबंधांचे जाळे हळूहळू कमकुवत होत जाते.

याचा अर्थ असा नाही की विवाह न करणारे सर्वच लोक चुकीचे आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. काही जण जाणीवपूर्वक अविवाहित राहण्याचा निर्णय घेतात आणि त्यात समाधानीही असतात. काहींसाठी विवाह योग्य पर्याय नसू शकतो. त्यामुळे विवाहाला सक्तीचे स्वरूप देणे किंवा अविवाहित राहणाऱ्यांना दोष देणे योग्य ठरणार नाही.

प्रश्न व्यक्तिस्वातंत्र्याचा नसून सामाजिक संतुलनाचा आहे. खरे तर समस्या विवाह उशिरा होण्यात नाही, तर जीवनातील प्राधान्यक्रमांच्या असंतुलनात आहे. करिअर, पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची आहेतच, पण त्याचवेळी नातेसंबंध, कुटुंब आणि भावनिक आधारही तितकाच महत्त्वाचा आहे. आधुनिक जीवनशैलीत अनेकांना व्यावसायिक यश मिळते, पण वैयक्तिक आयुष्यात एकटेपणाची पोकळी जाणवते.

सोशल मीडियावर हजारो मित्र असले तरी संकटाच्या वेळी सोबत उभे राहणारे काहीच लोक असतात. कुटुंब ही त्या अर्थाने केवळ सामाजिक संस्था नसून भावनिक सुरक्षेची जागा आहे.

पालकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. अनेक पालक आपल्या मुलांकडून अत्यधिक अपेक्षा ठेवतात. शिक्षण, नोकरी, घर, गाडी आणि आर्थिक स्थैर्य या सर्व गोष्टी पूर्ण झाल्यानंतरच विवाहाचा विचार करावा, असा आग्रह धरला जातो. परिणामी विवाहासाठी योग्य काळ निघून जातो. मुलांच्या आयुष्याविषयी निर्णय घेताना त्यांच्या भावनिक आणि सामाजिक गरजांचाही विचार होणे आवश्यक आहे.

समाजानेही बदलत्या वास्तवाला समजून घेण्याची गरज आहे. आजची पिढी पूर्वीच्या पिढीसारखी विचार करणार नाही, हे स्वीकारावे लागेल. विवाहाबाबत संवाद अधिक खुला आणि समंजस असला पाहिजे. विवाह म्हणजे केवळ सामाजिक दबाव किंवा परंपरेचे पालन नसून परस्पर आदर, जबाबदारी आणि सहजीवनाची तयारी आहे, हे तरुणांना पटवून सांगावे लागेल.

भारतासारख्या देशात कुटुंबसंस्था अजूनही सामाजिक जीवनाचा कणा आहे. त्यामुळे विवाहसंस्थेचे महत्त्व पूर्णपणे संपुष्टात येईल, असे म्हणणे घाईचे ठरेल. मात्र विवाहाचे वय वाढणे, अविवाहित राहण्याची प्रवृत्ती वाढणे आणि जन्मदरात घट होणे ही वास्तवातील चिन्हे आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

शेवटी प्रश्न एवढाच आहे की, आपण आधुनिकतेच्या नावाखाली नातेसंबंधांचे महत्त्व विसरत तर नाही ना? करिअर, पैसा आणि यश यांच्यामागे धावताना कुटुंबाच्या उबदार सावलीपासून दूर तर जात नाही ना? समाजाची खरी ताकद केवळ अर्थव्यवस्थेत नसते तर ती कुटुंब, संस्कार आणि परस्पर आधाराच्या नात्यांत असते.

जर पुढील पिढीने विवाहसंस्थेकडे केवळ ओझे किंवा बंधन म्हणून पाहण्यास सुरुवात केली, तर त्याचे परिणाम केवळ वैयक्तिक पातळीवर नव्हे तर संपूर्ण समाजरचनेवर होतील. म्हणूनच आज गरज आहे ती संतुलित विचारांची, समंजस निर्णयांची आणि नातेसंबंधांच्या पुनर्मूल्यांकनाची.

कारण विकासाची खरी व्याख्या केवळ आर्थिक समृद्धी नसून मजबूत कुटुंबे, सुदृढ नातेसंबंध आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध समाज हीच आहे.

येणारा काळ अविवाहितांचे युग ठरेल की नाही हे भविष्य ठरवेल, पण कुटुंबसंस्था, विवाह आणि मानवी नातेसंबंधांचे महत्त्व कधीच संपणार नाही, हे तितकेच खरे आहे.

## फादर्स डे विशेष

# वडिलांची सावली.. स्वप्नांना पंख देणारा आधार

जिव्हाळा ज्याने दिलासा दिला,
एक हृदय ज्याने धैर्य दिले भीतीचा कुजबुडा
जरी असला तरी, ते दिपस्तंभाच्या आवाजात बोलतात–
उजळ, तेजस्वी, आणि ठाम.
संशयाने जरी आपला आत्मविश्वास घालवू लागला असता, ते
आपल्याला आपल्या आतच असलेल्या शक्तीची जाणीव करून देतात
आणि आपल्याला थोडं उंच उभं राहण्यास, थोडं जास्त प्रयत्न
करण्यास, थोडं जास्त प्रेम करण्यास प्रेरित करतात.असे आमचे नागेश पप्पा
! तुम्हां फादर्स डे च्या हार्दिक शुभेच्छा .
स्वतः उन्हात उभं राहून आम्हाला सावली देणारा तुम्ही विशाल वटवृक्ष आहात.
आम्ही पडलो तर आम्हाला
तुम्ही उचलले, हरलो तर धीर दिले,
आम्ही जिंकलो तर शांतपणे अभिमानाने
हसले. या जिव्हाळा परिवाराने नेहमीच
आपल्याला प्रेम, विश्वास आणि संस्काराची
छाया ठेवली आहे. जिव्हाळा परिवारामध्ये
महाराष्ट्रातील विदर्भ आणि अरुणाचल
प्रदेशातील मुली उच्च शिक्षण घेतात. कुणी
एमबीबीएस, एमबीए, बीफार्म, फिजीओथेरपी,
कुणी युपीएससी परीक्षेची तयारी दिल्ली, पुणे मध्ये
करत आहेत.
मुलींची शिक्षण घेण्याची आवड , जिद्द आणि पाटील
सरांचे सामाजिक कार्य करण्याची धडपड बघुन श्री
माधव विचोरे सरांनी आपले राहते घर मुलीच्या
राहण्याच्या व्यवस्थेसाठी दान दिले सरांनी फक्त मुलांना
एक घर
दिले नाही तर मुलींच्या स्वप्नांना
पंख देण्याचे महान असे कार्य केले.
आज कितीही मोठे झालो तरी,
तुमच्या सावलीतच सुरक्षित वाटतं.
जेव्हा मी दिल्लीवरून पहिल्यांदा आपल्या जिव्हाळा परिवारात आली
तेव्हा ज्याप्रमाणे तुम्ही मला प्रेमाने आपल्या मुलीप्रमाणे माझी काळजी
घेतली. मला तुम्ही हट्ट करून दही, आंबे जेवण पोटभर खायला दिले ते
बघून मन भ'रवून गेलं, कदाचीत आपल्या नागपूर मध्ये विदर्भा मध्ये , आणि
देशामध्ये कित्येक संस्था आहेत पण फक्त जिव्हाळामधेच इतक प्रेम करणारे
आमचे वडील म्हणून आम्हाला सावली देणारे तुम्ही एकटेच आहेत आमच्या प्रत्येक
हास्यामागे तुमचा त्याग आहे.
तुम्ही आहात म्हणून आयुष्य सुंदर
आहे.
नागेश पप्पा, तुमच्यावर मनापासून प्रेम
आहे आणि कायम राहील.
आजच्या या खास दिवशी फक्त एवढंच
म्हणावंसं वाटतं -
नागेश पप्पा , तुमचं अस्तित्वच आमच्या समस्त
जिव्हाळा कन्यासाठी सर्वात मोठं आशीर्वाद आहे.
तुमच्या कष्टांचं ऋण आम्ही कधीच फेडू शकणार
नाही, पण तुमचा अभिमान बनण्याचा प्रयत्न
आयुष्यभर आम्ही करत राहू...



आपली जिव्हाळा कन्या
■ सायली खोब्रागडे

# माझे विश्वरूप दर्शन

शीर्षक, म्हणजेच मथळा बघून चमकला असाल ना? पण हे खरं आहे. आज सकाळी सकाळीच मला माझेच विश्वरूप दर्शन झाले. तुम्ही माज्या जागी स्वतःला ठेऊन बघा. तुम्हालाही होईल स्वतःचे विश्वरूप दर्शन.

म्हणजे झाले असे की सकाळी मी आरशा समोर दाढी करायला उभा राहिलो. माझ्या गालांवर साबण लावत असतांना मला उगाच मनात विचार आला. माझा हात माझ्याच गालांना साबण लावत आहे, हे माझे डोळे बघत आहेत, ह्याची नोंद माझाच मेंदू घेत आहे. तर माझेच पाय मला उभे ठेवत आहेत.

माझे पोट नाश्त्याची वाट बघत आहे. कल्पनेनेच माज्या जिभेला पाणी सुटत आहे. हे सगळे होत आहे ते माज्याच अवयवांच्या मुळे. पण मुळात हे माझे अवयव नाहीत, तर माझ्या शरीराचे अवयव आहेत. हे माझे शरीर आहे हे मान्य, पण मग मी कोठे आहे? या शरीरातच कोठेतरी आहे?

असे असेल तर, जसे माझे शरीर असून मी कायम शरीरातच राहायला हवा, तर मग माझे घर असल्याने मी कायम घरातच राहायला हवा. माझी गाडी असेल तर मी कायम गाडीतच असायला हवा. माझे ऑफिस आहे तर मी ऑफिस मध्येच कायम राहायला हवा. पण तसे नसते. मी माझे घर, ऑफिस सोडून इतरत्र देखील जात येत राहत असतो. तर मग मी माझ्या शरीराबाहेर देखील राहतो की काय? असल्यास कोठे? उगाच डोके भंजाळविण्यात काय फायदा? अश्या विचाराने मी दाढी करणे सुरू केले. तेव्हढ्यात माझ्या पिटुकल्या नातीने आबा अशी हाक मारली, आणि माझ्या समोर माझेच विश्वरूप दर्शन दिसणे सुरू झाले.

म्हणजे मी माझ्या शरीरा बाहेर नातीच्या मनात आबा म्हणून राहतोय, मुलाच्या आणि मुलीच्या मनात पिता म्हणून राहतोय, पत्नीच्या मनात पती म्हणून राहतोय. आई वडिलांच्या करीता, गुरु आणि चुलत्यांच्या करीता पुत्र म्हणून राहत आहे.

माझा भाऊ आणि बहिणीचा दादा, जिवलग बंधु आहे. तसे तर मी मित्रांच्या मनात मित्र म्हणून, माझ्या कंपनीतील कामगारांच्या, शेतातील पिकांच्या, परिसरातील वृक्षांच्या करीता मी पालक म्हणून राहत आहे. माझ्या विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षक म्हणून, माझ्या शिक्षकांच्या साठीच नव्हे तर माझा ट्यूबलेस टायरचे पंक्चर दुरुस्त करणाऱ्याकडे हे कसे करतात ते बघून मुकाट्याने शिकून घेणारा विद्यार्थी म्हणून रहात आहे. माझ्या कॉलनी मध्ये, नगरामध्ये, शहरामध्ये, राज्यामध्ये आणि देशाच्याही मना मध्ये मी एक नागरिक म्हणून राहत आहे. मी सीमेवर आपली लष्करी सेवा बजावत असतांना मी शत्रूच्या मनात दुश्मन म्हणून राहणे सुरू केले. आमच्या सोसायटीत मी शेजारी म्हणून देखील राहतो. ओळखीच्या काही लोकांच्या मनात मी त्यांचा सुहृद किंवा स्नेही म्हणून पण घर केलेले आहे.

ऑफिस मधील कर्मचाऱ्यांच्या मनात मी साहेब म्हणूनही वास करीत आहे. मी इंजीनियर असूनही आचार्य पदवी प्राप्त केल्याने काही लोकं मला डॉक्टर म्हणूनही त्यांच्या डोक्यात स्थान देऊन आहेत. माझे उद्योग क्षेत्रातील मित्र मला इंजीनियर या भूमिकेतून मनात स्थान देऊन आहेत.

रोज मला श्रीगणेशाच्या मंदिरात नित्य दर्शनाला जाताना बघून त्या परिसरातील काही मंडळी मला भक्त म्हणूनही आपल्या मानसात स्थान देऊन आहेत, तर मी कधीच कोणत्याही भोंदू बाबांना मानत नसल्याने त्या बाबालोकांच्या अनुयायांच्या मनात मी नास्तिक म्हणूनही जागा मिळविली आहे. काही काही मंडळींनी मला त्यांच्या मनात एक आदर्श व्यक्ति म्हणून जागा दिलेली आहे. हायवे वरील अपघातात जखमी व्यक्तिला उचलून आपल्या गाडीने त्वरित रुग्णालयात दाखल करून वेळेवर रक्तदान केल्याने त्या व्यक्तीने त्याच्या मनात मला जीवन दाता, देवदूत म्हणून जागा दिलेली आहे, तर चकमकीत शत्रूच्या शिपायाला ठार मारल्याने त्याच्या घरच्यालोकांच्या मनात मी एक यमदूत, सैतान म्हणून स्थान बळकावून बसलोय.



डॉ. अविनाश प. परांजपे

त्यावेळी आमच्या मेजर साहेबांनी मला हमारा शेर अशी उपमा देऊन गौरविले. त्यांच्या मनात मी एक शेर म्हणून राहतो. आमच्या इंजीनीरिंग कॉलेजच्या एका गेट टु गेदरमध्ये मला नकळत, कोल्ड ड्रिंक मध्ये मिसळून चेष्टा, थट्टा मस्करी मध्ये दारु पाजून काहीवेळ डोला रे डोला करायला लाऊन माझी 'बेवडा ' अशा प्रतिमेने काहींच्या मनात घरकरुन मी राहत आहे.

रस्त्यावर एका कॉलेज तरुणीला छेडणाऱ्या मवाली गुंडाशी सामना करुन त्याच्या चाकुचा वार सहन करुनही, तिची सुटका करविल्याने तिच्या मनात मला या काळातील 'श्रीकृष्ण' असे स्थान मिळाले आहे. त्याच कारणाने माझ्या काही नातेवाईकांच्या मनात रोडवर मारामाऱ्या करणारा असे स्थान मला मिळाले आहे.

तर त्याच धिप्पाड मवाली गुंडाने माझा उल्लेख ए मच्छर अशी शिवी देऊन केला होता. त्याच्या मनात मी एक मच्छर किंवा कीटक म्हणून राहतो. मी मटन, चिकन, कधी कधी खात असल्याने बोकड किंवा कोंबडी यांच्या मनात मी भक्षक म्हणून राहतो. तर अभयारण्यातील वाघ बिबट्या ह्यांच्या मनात मी भक्ष म्हणूनही राहतो.

परदेशातील लोकं मला भारतीय म्हणून ओळखतात, तर परग्रहातील मंडळी मला पृथ्वी वासी म्हणून त्यांच्या मनात जागा देत असतील. कोणी सांगावे?

माझे काही वाचक मला लेखक म्हणून मनात जागा देतात, तर माझे बरेचशे ओळखीचे लोक मला एक सज्जन व्यक्ति म्हणून आपल्या हृदयात स्थान देतात. मला अजिबात न ओळखणारे लोकं मला केवळ एक व्यक्ति म्हणून आपल्या मनात जागा देऊन असतात.

हे सगळे माझ्या गेल्या इतक्या वर्षांच्या आयुष्यात मिळालेल्या स्थानांच्या बद्दल आहे. उद्या जेव्हा कधी माझा मृत्यू होईल, त्यावेळी मला काही लोकं फक्त एक दिवंगत शरीर किंवा बॉडी अशाच नावाने मनात स्थान देतील.

याचा अर्थ असा की मी केवळ माझ्या शरीरातच राहत नाही, तर इतरांच्या मनात देखील रहिवास करतो. त्यामुळेच मला असा साक्षात्कार झाला की मी, एक सामान्य व्यक्ति असूनही माझी रुपे किती जग व्यापून आहेत ?

आबा, पिता, पती, मित्र, पुत्र, पालक, विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, दुश्मन, शेजारी, स्नेही, साहेब, डॉक्टर, इंजीनियर, भक्त, नास्तिक, आदर्श व्यक्ति, जीवन दाता, देवदूत, यमदूत, सैतान, शेर, बेवडा, श्रीकृष्ण, मच्छर, भक्षक, भक्ष, भारतीय, पृथ्वीवासी, लेखक, सज्जन व्यक्ति, नुसती व्यक्ति, काय काय म्हणून मी ह्या जगतात स्थान मिळविले आहे? बापरे, अजून बरेच माथ्यावरचे टिळे असतील जे मला सकाळी आठवले नाहीत, अथवा माहिती नाहीत, किंवा अजून मिळायचे आहेत .

याचाच असा अर्थ मी समजलो की मी, जसा सर्व जगव्यापी रहिवास करणारा आहे, तसाच प्रत्येक मानव ही आहेच की नाही? कदाचित पार्थ अर्जुनास भगवान श्रीकृष्णाने जे विश्वरूप दाखविले ते अशाच स्वरूपाचे तर नसेल?

कारण माझ्या या सगळ्या रुपांची जर मस्तक रुपी ओळीने रांग लावली तर ती ही अशीच सौम्य, चांगल्या स्वरूपापासून क्रुर भयंकारी चेहऱ्यांचीच असेल. जी आपण भगवान श्रीकृष्णांच्या विश्वरूपाच्या मध्ये बघतो. कारण प्रत्येक प्राणिमात्रांच्या मध्ये ईश्वर वास करतोच ना?

---

(लेखक साहित्यिक आहेत)
वानाडोंगरी, नागपूर.
9370297441

# कंगना साकारतेय धाडसी नर्स



'भारत भाग्य विधाता' या आगामी चित्रपटात कंगना राणावत २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील एका धाडसी नर्सची मुख्य भूमिका साकारत आहे. या भूमिकेतील तिचा अभिनय अत्यंत संवेदनशील आणि प्रभावी असेल, यात शंका नाही; कारण अभिनयातील उत्कटता हा तिचा सर्वात मोठा पैलू आहे. बॉलिवूडमध्ये कोणत्याही गॉडफादरशिवाय आलेली कंगना सुरुवातीला भाषेच्या अडचणींमुळे आणि नकारांमुळे प्रचंड स्ट्रगलमधून गेली. मात्र, गँगस्टर, फॅशन आणि क्वीन या चित्रपटांनी तिचे नशीब बदलले. तनु वेड्स मनुमधील तिची दुहेरी भूमिका आणि मणिकर्णिका मधील झाशीची राणी या भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत.

कंगना केवळ तिच्या अष्टपैलू अभिनयासाठीच नाही, तर तिच्या बोल्ड, बिनधास्त आणि रोखठोक व्यक्तिमत्त्वासाठीही ओळखली जाते. कोणत्याही विषयावर उघडपणे आणि निर्भीडपणे मत मंडण्याच्या तिच्या वृत्तीमुळे ती नेहमीच चर्चेत असते. तिचा हाच निडरपणा तिच्या ऑन-स्क्रीन भूमिकांमध्ये आणि वैयक्तिक आयुष्यातही ठळकपणे दिसून येतो. एक अष्टपैलू अभिनेत्री शिवाय खासदार असलेली बिनधास्त कंगना राणावत आपली राजकीय जबाबदारी आणि चित्रपटसृष्टीतील अभिनयाची आवड या दोन्ही गोष्टी अत्यंत प्रभावीपणे एकाच वेळी सांभाळत आहेत.

# गूढ कोर्टरूम ड्रामा



रहस्याचा थरारक आणि उत्कंठावर्धक वेढा असलेले सांगा कसं जगायचं हे सस्पेन्स-थ्रिलर मराठी नाटक ११ जून २०२६ रोजी पुण्याच्या ऐतिहासिक बालगंधर्व रंगमंदिर येथे सादर होत आहे. अद्वैत थिएटर्स निर्मित या नाटकाचे दिग्दर्शन विजय केंकरे यांनी केले आहे. नाटकाच्या मुख्य भूमिकेत उमेश कामत (एक ध्येयवादी वकील) आणि स्पृहा जोशी (न्यायाच्या शोधात असलेली महिला) आहेत. त्यांना ज्येष्ठ अभिनेते प्रदीप वेलणकर आणि पुष्कर श्रोत्री यांची मजबूत साथ लाभली आहे. सर्वच कलाकारांनी आपल्या कसदार अभिनयाने कोर्टरूम ड्रामा आणि अपघाताचे गूढ रंगमंचावर जिवंत केले आहे.

नाटकाच्या तालमीदरम्यान घडलेले दोन किस्से विशेष रंगतदार आहेत. पहिला म्हणजे, एका गंभीर कोर्टरूमच्या दृश्याची तालीम सुरू असताना पुष्कर श्रोत्री यांनी अचानक एक असा विनोदी संवाद मारला की, गंभीर चेहऱ्याने उभा असलेला उमेश कामत आपलं हसू रोखू शकला नाही आणि संपूर्ण तालीम काही काळ थांबवावी लागली. दुसरा किस्सा, एका रात्रीच्या तालमीत स्पृहा जोशीने एका अत्यंत भावनिक स्वगताचा असा काही अप्रतिम परफॉर्मन्स दिला की, समोर बसलेल्या दिग्दर्शक विजय केंकरे यांच्यासह सर्व सहकलाकारांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या.

# उलगडणार २६/११चं वास्तव



२६/११ च्या मुंबई हल्ल्यातील अज्ञात शूरवीरांचे वास्तव धाडस पडद्यावर आणणारा 'भारत भाग्य विधाता' हा हिंदी चित्रपट सध्या चर्चेत आहे. सुरक्षारक्षकांबरोबरच सामान्य नागरिकांनी दाखवलेल्या अद्भुत धैर्याची थरारक कथा चित्रपटगृहात पाहायला मिळणार आहे.

या चित्रपटाचा नुकताच रिलीज झालेला ट्रेलर आणि मोशन पोस्टर प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारे आहे. चित्रपटाचे कथानक २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यादरम्यान कामा हॉस्पिटलमधील वैद्यकीय कर्मचारी, परिचारिका आणि वॉर्ड बॉईज यांनी प्राणांची बाजी लावून जवळपास ४०० रुग्णांचे प्राण कसे वाचवले, या सत्य घटनेवर आधारित आहे. मणिकर्णिका फिल्म्स आणि पेन स्टुडिओजचे डॉ. जयंतीलाल गडा निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन मनोज तापडिया यांनी केले आहे. यात अभिनेत्री कंगना रनौत एका धाडसी नर्सच्या मुख्य भूमिकेत दिसणार असून, तिला गिरिजा ओक, स्मिता तांबे, रसिका आगाशे, ईशा डे आणि प्रिया बेर्डे या कसलेल्या अभिनेत्रींची भक्कम साथ लाभली आहे. सामान्य नागरिकांच्या अभूतपूर्व धैर्याची ही थरारक गाथा रुपेरी पडद्यावर पाहणे नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

# 'द पिरॅमिड स्कीम'चा जीवघेणा सापळा



'द पिरॅमिड स्कीम' ही बहुचर्चित नवी मालिका ॲमेझॉन प्राईम व्हिडिओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे. पैशाच्या मोहापायी होणाऱ्या विनाशाचे हे वास्तव असून, खोट्या योजनांच्या जाळ्यात माणसांचे संबंध आणि संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे, या कथेभोवती ही मालिका फिरते. द व्हायरल फिव्हर (टीव्हीएफ) निर्मित या सिरीजचे दिग्दर्शन श्रेयांश पांडे आणि आशिष आर. शुक्ला यांनी केले आहे. आर्थिक घोटाळे आणि झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासावर आधारित या कथेत परमवीर सिंग चीमा (गोल्डी) मुख्य भूमिकेत असून, रणवीर शोरी (मनोज) यांनी एका मार्केटिंग स्कीम चालवणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तीची भूमिका साकारली आहे. त्यांना अंजन श्रीवास्तव, शेखर सुमन आणि सुशांत सिंग या कलाकारांची उत्तम साथ लाभली आहे. पैशाच्या फसव्या जाळ्याची भीषणता दाखवण्यासाठी या सिरीजचे मुख्य चित्रीकरण दिल्लीच्या मध्यमवर्गीय वस्त्या, जुने कारखाने आणि नोएडामधील व्यापारी संकुलांमध्ये करण्यात आले आहे. चित्रीकरणादरम्यानचे दोन किस्से कमालीचे गाजले. पहिला म्हणजे, एका महत्त्वाच्या दृश्यात परमवीर चीमा इतका भावूक झाला की कट म्हटल्यानंतरही त्याचे रडू थांबेना, तेव्हा ज्येष्ठ अभिनेते अंजन श्रीवास्तव यांनी त्याला मिठी मारून धीर दिला. दुसरा किस्सा, एका अत्यंत गंभीर संवादाच्या दृश्यात रणवीर शोरीने अनपेक्षितपणे केलेली मजेशीर सुधारणा पाहून दिग्दर्शकांसह संपूर्ण क्रू हसू दाबत कॅमेऱ्यामागे शांत बसला होता, ज्याचा अंतिम शॉट अतिशय उत्तम आला.

# कौटुंबिक मनोरंजनाचा नजराणा



सासू-सुनेच्या नात्याची खुसखुशीत जुगलबंदी, अशी परिणामकारक ओळख असलेला हा मराठी चित्रपट पारंपारिक मूल्ये आणि आधुनिक विचारांचा सुरेख मेळ घालतो. वैभव फिल्म्स आणि भागीदार निर्मिती संस्थांनी कौटुंबिक मूल्यांची जपणूक करत या सिनेमाची भव्य निर्मिती केली आहे. संवेदनशील व व्यावसायिक दिग्दर्शनाचा उत्तम अनुभव असलेले दिग्दर्शक वैभव चिंचालकर यांनी सासू-सुनेमधील वैचारिक नाते अत्यंत खेळकर पद्धतीने पडद्यावर मांडले आहे.

चित्रपटात ज्येष्ठअभिनेत्री निर्मिती सावंत यांनी खाष्ट पण प्रेमळ सासू (अरुणा) साकारली असून पूजा सावंतने कणखर, आधुनिक सुनेची भूमिका साकारली आहे. ऋषी मनोहर ३४ वर्षांच्या मुलाच्या भूमिकेत असून, आनंद इंगळे आणि आनंद काळे यांनी कथानकात विनोदाचे रंग भरले आहेत. चित्रीकरणादरम्यान निर्मिती सावंत आणि पूजा सावंत यांच्यातील खऱ्या आयुष्यातील मैत्रीमुळे सेटवर अनेक अविस्मरणीय, मजेशीर किस्से घडले. त्यामुळे दोघींची पडद्यावरील केमिस्ट्री अधिकच जिवंत झाली आहे. पत्रिका आणि अटींमुळे उडणारा धमाल गोंधळ, निखळ विनोद आणि कौटुंबिक भावनांचा आस्वाद घेण्यासाठी संपूर्ण कुटुंबासह चित्रपटगृहात जाऊन हा सिनेमा नक्कीच पाहावा असा आहे.

# रंगणार हेलन-करिष्मा जुगलबंदी!

रहस्याचा गडद आणि थरारक वेढा असणारी 'ब्राऊन' ही बहुप्रतिक्षित क्राइम थ्रिलर वेब सीरिज झी ५ वर प्रदर्शित होत आहे. झी स्टुडिओज निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन अभिनय देव यांनी केले असून, यात करिश्मा कपूर मुख्य भूमिकेत (रीता ब्राउन या पोलीस अधिकाऱ्याच्या रूपात) कमबॅक करत आहे. तिच्यासोबत ज्येष्ठअभिनेत्री हेलन आणि सुप्रसिद्ध अभिनेते सुशांत सिंग प्रमुख भूमिकेत आहेत, तर सोनिया बाल्शानी आणि जितिन गुलाटी यांनी महत्त्वाच्या सहाय्यक भूमिका साकारल्या आहेत. या सीरिजचे बहुतांश चित्रीकरण कोलकाता येथील गजबजलेल्या गल्ल्या, जुन्या वास्तू आणि हावडा ब्रिजच्या परिसरात झाले आहे.

चित्रीकरणादरम्यान कोलकात्याच्या कडक उन्हात आणि गर्दीत शूटिंग करताना करिश्मा कपूरला पाहण्यासाठी हजारो चाहत्यांनी गर्दी केली होती. त्यामुळे क्रूला अनेकदा रात्रीच्या वेळी गुप्तपणे शूट करावे लागले. दुसरा किस्सा म्हणजे, ज्येष्ठ अभिनेत्री हेलन बऱ्याच वर्षांनी कॅमेऱ्यासमोर येत असल्याने संपूर्ण सेटवर प्रचंड आदराचे वातावरण होते; एका कठीण भावनिक दृश्यानंतर हेलन यांच्या उत्कृष्ट अभिनयासाठी दिग्दर्शकांसह संपूर्ण युनिटने उभे राहून टाळ्या वाजवल्या होत्या.



# ऑफिसमधील प्रेमाची हळूवार कहाणी



ऑफिसमधील कामाच्या धावपळीत नवीन प्रेम बहरते आणि चार भिंतींच्या आत एक सुंदर रोमँटिक कहाणी सुरू होते, असे कथानक लवकरच पहायला मिळणार आहे. कॉर्पोरेट जगातील गोड-आंबट नात्यांची गुंफण असणारी 'ऑफिस रोमान्स' ही हलकी फुलकी रोमँटिक ड्रामा वेब सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. 'धर्माटिक एंटरटेनमेंट' निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन शकुन बत्रा यांनी केले असून, यात तृप्ती डिमरी आणि रोहित सराफ मुख्य भूमिकांमध्ये पाहायला मिळतील. त्यांच्यासोबत पंकज त्रिपाठी आणि सुप्रिया पाठक यांनी महत्त्वाच्या सहाय्यक भूमिका साकारल्या आहेत. या सीरिजचे मुख्य चित्रीकरण मुंबईतील बीकेसी मधील आधुनिक कॉर्पोरेट ऑफिस, सायबर सिटी गुरुग्राम आणि गोव्यातील एका नयनरम्य रिसॉर्टमध्ये झाले आहे. चित्रीकरणादरम्यानचे दोन किस्से अत्यंत मजेशीर आहेत. पहिला म्हणजे, एका गंभीर ऑफिस मीटिंगच्या दृश्यात पंकज त्रिपाठी यांनी अचानक संवादांची अशी काही पेरणी केली की, समोर बसलेल्या तृप्ती आणि रोहितला आपले हसू आवरता आले नाही आणि सलग पाच रिटेक घ्यावे लागले. दुसरा किस्सा म्हणजे, गोव्यातील एका गाण्याच्या शूटदरम्यान अचानक पाऊस सुरू झाला; परंतु दिग्दर्शकांनी शूटिंग न थांबवता तो पावसाला पण कथेचा भाग बनवले.

# हटके प्रेमकहाणी

काळजाला भिडणाऱ्या निखळ प्रेमाचा प्रवास असणारी 'एव्हरी इयर आफ्टर' ही भावनिक रोमँटिक ड्रामा सीरिज प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होत आहे. एक्सेल एंटरटेनमेंट निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन झोया अख्तर यांनी केले असून, यात सिद्धांत चतुर्वेदी आणि वामिका गब्बी मुख्य भूमिकेत पाहायला मिळतील. दरवर्षी एका विशिष्ट दिवशी भेटणाऱ्या दोन प्रेमींची ही कथा असून, यात नसीरुद्दीन शाह आणि शेफाली शाह यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. या सीरिजचे चित्रीकरण हिमाचल प्रदेशमधील सिमला, जुने मनाली आणि मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर झाले आहे. सिमला येथील कडाक्याच्या थंडीत एका भावनिक दृश्याचे शूट सुरू असताना अचानक बर्फवृष्टी सुरू झाली. निसर्गाच्या या जादूमुळे ते दृश्य पूर्वलिखित कल्पनेपेक्षाही कमालीचे सुंदर चित्रित झाले. दुसरा किस्सा म्हणजे, एका गंभीर संवादाच्या वेळी पडद्यामागे नसीरुद्दीन शाह यांनी सेटवरील तरुण कलाकारांना अभिनयाचे काही खास तंत्र शिकवले; यामुळे प्रभावित होऊन संपूर्ण युनिटने दिग्दर्शकांसह कौतुकाचा वर्षाव केला.



## भारतीय समाजमन




**आग नेहमी पुरावेच जाळते... जबाबदारी मात्र कधीच नाही!**

# युद्धाचा गाजावाजा शेवटी चर्चेचाच मार्ग!

मध्यपूर्वेतील इराण-इस्त्राईल संघर्ष आणि त्यात अमेरिकेच्या सहभागामुळे जग पुन्हा एकदा युद्धाच्या उंबरठ्यावर उभे राहिल्याची भावना निर्माण झाली होती. मात्र काही दिवसांच्या तणाव, हल्ले आणि प्रत्युत्तरांच्या मालिकेनंतर पुन्हा एकदा चर्चेचा मार्ग स्वीकारला जात असल्याचे चित्र दिसू लागले आहे. त्यामुळे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहे, जर शेवटी चर्चेच्या टेबलावरच बसायचे होते, तर युद्धाचा मार्ग स्वीकारण्याची गरज काय होती?







संघर्षाच्या सुरुवातीला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही प्रसंगी इस्त्राईलच्या आक्रमक भूमिकेवर नाराजी व्यक्त केल्याचे वृत्त समोर आले. मात्र त्याच काळात अमेरिकेने इराणविरोधात लष्करी कारवाया केल्याने वॉशिंग्टनची भूमिका नेमकी काय आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला.

एका बाजूला युद्धविरामाची घोषणा, तर दुसऱ्या बाजूला हल्ल्यांचे समर्थन ; एका बाजूला शांततेच्या चर्चा, तर दुसऱ्या बाजूला निर्बंध आणि दबावाचे राजकारण. या विरोधाभासांनी आंतरराष्ट्रीय राजकारणातील दुहेरी निकष पुन्हा अधोरेखित केले.

युरोपमध्ये संभाव्य करारावर स्वाक्षऱ्या होण्याच्या चर्चा सुरू आहेत. या करारानंतर पुढील साठ दिवसात इराणच्या अणु कार्यक्रम संबंधीचे प्रश्न, इराणला देण्यात येणारी संभाव्य नुकसान भरपाई, अमेरिकेने लादलेले निर्बंध हटविणे आणि गाझा प्रश्नावर चर्चा होणार असल्याचे संकेत आहेत.

विशेष म्हणजे इराणच्या युरेनियम संवर्धनाचा मुद्दा पहिल्या टप्प्यात चर्चेच्या केंद्रस्थानी नसल्याचे सांगितले जात आहे. बॅलेस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमाचाही समावेश चर्चेच्या प्राथमिक अजेंड्यात नाही. यामुळे संघर्षाची प्रमुख कारणे बाजूला ठेवून शांततेकडे वाटचाल होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

संघर्षाचा सर्वाधिक फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसला. तेलाच्या किमतींमध्ये अस्थिरता वाढली, शेअर बाजारात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आणि अनेक देशांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम झाला. होर्मुझ सामुद्रधुनीचा प्रश्नही चर्चेत राहिला. जगातील ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या मार्गावरील नियंत्रण आणि सुरक्षेचा मुद्दा भविष्यातही संवेदनशील राहणार आहे.

इराणच्या गोठवून ठेवलेल्या अब्जावधी डॉलरच्या मालमत्तेबाबतही उत्सुकता आहे. या निधीपैकी किती रक्कम मुक्त होणार, यावर भविष्यातील संबंधांची दिशा ठरणार आहे. लेबनॉनमधील युद्धबंदीच्या शक्यतेमुळे प्रदेशात काही प्रमाणात स्थैर्य येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मध्य-पूर्वेतील संघर्षात एक महत्त्वाचा पैलू म्हणजे इराणची रणनीती. अनेक राजकीय विश्लेषकांच्या मते, इराणने लष्करी सामर्थ्याने जगाला चकित केले. शिवाय दीर्घकालीन राजनैतिक, आर्थिक आणि प्रादेशिक प्रभावाचा वापर करून आपली भूमिका मजबूत ठेवली.

परिणामी अमेरिका आणि इस्त्राईलला अपेक्षित परिणाम पूर्णपणे साध्य करता आले नाहीत, असा दावा काही तज्ज्ञ करतात. विशेषतः इस्त्राईलला सुरक्षा, अर्थव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय प्रतिमेच्या आघाड्यांवर मोठ्या दबावाचा सामना करावा लागल्याचेही मत व्यक्त केले जाते.

मात्र या संघर्षातून मिळालेला सर्वात मोठा धडा म्हणजे युद्ध कधीही अंतीम उत्तर नसते. युद्धामुळे मानवी जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि प्रादेशिक अस्थिरता वाढते; पण शेवटी समाधानाचा मार्ग संवादातूनच शोधावा लागतो. त्यामुळे मध्यपूर्वेतील या संघर्षाने जगाला पुन्हा एकदा आठवण करून दिली आहे की, रणांगणावर मिळणाऱ्या विजयापेक्षा चर्चेच्या टेबलावर मिळणारी शांतता अधिक टिकाऊ आणि महत्त्वाची असते.

---------------

(लेखक 'महासागर'चे राज्य राजकीय संपादक आहेत.)

# रुग्णांची लूट, मुंढेंची थेट झडतीची सूट!

आरोग्य सेवा ही सेवा असायला हवी, पण दुर्दैवाने आज तो ह्यामोठा व्यावसायिक उद्योगह्ल बनला आहे. जेव्हा हॉस्पिटलच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवतो, तेव्हा त्याला उपचाराच्या बिलाइतकी चिंता सतावते ती म्हणजे औषधांच्या चिठ्ठीची. हॉस्पिटलच्या आवारातील मेडिकलमधून औषधे घेण्याची सक्ती हा अनेक रुग्णांसाठी एक न सुटणारा आणि महागडा सापळा बनला आहे. मात्र, या मनमानी कारभाराला आता प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांनी लगाम घातला आहे.



स्वतःच्याच मेडिकलमधून औषधे घेण्याचा हट्ट कराल, तर याद राखा! असा थेट इशारा देत मुंढेंनी आरोग्य व्यवस्थेतील दलाली आणि नफेखोरीवर मोठा प्रहार केला आहे.



मनिषा जोंधळे

खरे तर, गरिबाचा खिसा आणि हॉस्पिटलची नशा..हे समीकरण आता बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. रुग्ण जेव्हा उपचारासाठी दाखल होतो, तेव्हा तो डॉक्टरांवर देवासारखा विश्वास ठेवून येतो. पण, बिल हातात पडते तेव्हा त्याला समजते की, उपचार महागले नाहीत, तर त्यामागील 'मेडिकलचा बाजार' महागला आहे. काय आहे हा मेडिकल-माफियाचा खेळ? हॉस्पिटलच्या नावावर चालणारे मेडिकल म्हणजे एक 'कमिशन'चे जाळे आहे.

रुग्ण उपचारांसाठी आधीच हवालदिल असतो. अशा वेळी त्याला ही औषधे बाहेर मिळणे कठीण आहे अशी दिशाभूल करणारी कारणे देऊन लुटले जाते. बाहेरच्या मार्केटमध्ये स्वस्त मिळणारी औषधे इथे एमआरपीवर विकली जातात. म्हणूनच म्हटले जाते,

*सेवेचा मुखवटा, लुटीचा कावा..*
*मुंढेंच्या दणक्याने, आता बंद व्हावा!*

ही केवळ आर्थिक लूट नाही, तर रुग्णांच्या हक्काची पायमल्ली आहे. ज्या व्यवस्थेत रुग्णाला स्वस्त आणि उत्तम उपचार मिळायला हवेत, तिथे जर फक्त औषधांच्या बिलातून वसुली होत असेल, तर तो गुन्हाच आहे.

तुकाराम मुंढे म्हणजे धडाकेबाज कामाची ओळख. जेव्हा ते बोलतात, तेव्हा त्यामागे ठोस कृती असते. रुग्ण हा हॉस्पिटलचा ग्राहक नाही, तर तो एक 'पिडीत' आहे. या मोहिमेत केवळ नोटीस देऊन ते थांबणार नाहीत, तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉस्पिटल्सवर कडक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. सामान्य माणसाच्या वेदनेला वाट करून देतानाच ते मांडतात की..

माणुसकीच्या बाजारात नफ्याचा हा खेळ कशाला?
औषधांच्या चिठ्ठीतून जो गरिबाचा जीव घेता
लक्षात ठेवा, तुकाराम मुंढेंचा हा अंकुश आता,
अन्यायाच्या भिंतींनाही मुळापासून उपटून टाकता!

आरोग्य व्यवस्थेत अमुलाग्र बदलाची अपेक्षा

मुंढेंचा हा निर्णय आरोग्य क्षेत्रातील भ्रष्ट प्रवृत्तींना धडा शिकवणारा ठरेल. जर एखादे हॉस्पिटल रुग्णावर औषधे घेण्याची सक्ती करत असेल, तर त्यामागे त्यांचा मोठा आर्थिक स्वार्थ दडलेला असतो.

ही साखळी तोडणे कठीण असले तरी, प्रशासकीय इच्छाशक्तीपुढे ती अशक्य नाही. आजच्या या परिस्थितीवर सांगावेसे वाटते:रुग्णाची हतबलता, हॉस्पिटलची उधारी;आता संपणार ही लुटारू-वारी!

मुंढेंनी सुरू केलेली ही मोहीम सर्वसामान्यांसाठी एक मोठा आधार बनली आहे. यापुढे कोणत्याही हॉस्पिटलला रुग्णाच्या हक्कावर गदा आणणे सोपे होणार नाही. शेवटी एवढेच म्हणता येईल की, आरोग्याचा बाजार थांबवा, रुग्णसेवाच मुख्य ठेवा!

---------------

(लेखिका शिक्षिका आहेत.)

■ ■ ■

## सुविचार

वादळ कितीही प्रचंड असले तरी ध्येयावर विश्वास ठेवणारी नौका किनारा गाठतेच.

# शरद पवारांचे चुकलेच?

## पक्ष उभा करणाऱ्यांची वेदना आणि वारसदारांचे राजकारण

मुंबईत परवा, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटाचा वर्धापन दिन झाला. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या आशीर्वादाने चालणाऱ्या राष्ट्रवादी अजित दादा पवार गटाचे बॅनर मुंबईत सर्व ठिकाणी झळकत होते. राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्या कार्यक्रमाला सत्ता नसेल, तर काय हाल असतात हे स्पष्टपणे दिसत होते. या दोन्ही वर्धापन दिनाला कुणाच्या तरी भाषणातून दोन्ही पक्ष आगामी काळात काय करणार आहेत? हे समोर येईल असे वाटले होते, पण घोर निराशा झाली. २७ वर्षाच्या मोठ्या संघर्षानंतर एखाद्या पक्षाला सोनेरी दिवस येतील, हे कुण्याही पक्षातील कार्यकर्त्याला वाटणे अगदी साहजिक होते. पण त्या सच्च्या कार्यकर्त्यांची येथे मात्र घोर निराशा दर दिवशी होते.

शरद पवार राष्ट्रवादी गट सत्तेवर नाही, आणि दुसरे अजित पवार गट सत्तेमध्ये असून सुद्धा सामान्य कार्यकर्त्याला कुणी विचारत विचारत नाही. अजित पवार नसल्यामुळे या पक्षाची ही अवस्था झाली आहे. जेवढे प्रश्न सत्तेमध्ये नसणाऱ्या शरद पवार राष्ट्रवादीमध्ये गटामध्ये आहेत, त्यापेक्षा जास्त गंभीर प्रश्न राष्ट्रवादी अजितदादा गटामध्ये आहेत.

पक्ष विभागून सुद्धा एवढी आवाज करण्याची ताकद या दोन्ही पक्षामध्ये अजून कायम कशी आहे? तर शरद पवार या माणसाच्या वैयक्तिक पुण्याईमुळे त्यांचा राष्ट्रवादी गट अजून तरला आहे. अजितदादांची छबी ते नसताना अजून कायम आहे, त्यात केवळ दादांची पुण्याई आहे, बाकी सर्व झूट आहे.

शरद पवार यांनी राजकारण करताना माणूस उभा कसा राहील याकडे पाहिले. कुरघोडीचे राजकारण कधीही केले नाही. म्हणून पवार यांच्या दूरदृष्टीतून हजारो संस्था, हजारो माणसे उभे राहिली. तसे ते करणे शरद पवार यांची खूप मोठी चूकच होते असे आजचे चित्र पाहून वाटते.

निव्वळ चांगुलपणा करण्यात शरद पवार चुकले? आणि ते पुढे कायम चुकत गेले? ज्यातून राष्ट्रवादी फुटली. राजकारणात घरातला माणूस सुद्धा गद्दार, धोकेबाज स्वार्थी असू शकतो हे शरद पवार यांना कळू नये? हे कमाल आहे. पवारांची मोठी अजून एक चूक झाली, ते म्हणजे ते सुप्रिया सुळे या त्यांच्या मुलीला घेऊन फारच हळवे झाले. त्यांची मुलगी सुप्रिया सुळे मुख्यमंत्री झाली पाहिजे, हे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले आणि तिथेच पवारांच्या घरात उभी फूट पडली.

लोकांना फार वाटते सर्व पवार घराणे एकच आहे, पण हा विचार करणे म्हणजे खूप मोठे चुकीचे होईल. पवारांच्या घरात एकी आहे असा देखावा केवळ सणावाराला केला जातो. भावकी काय असते हे अनुभवायचे असेल तर एखादा बारामतीच्या माणसाला विचारा तो तुम्हाला पवार भावकीमधील प्रेम मोठ्या चवीने सांगतील.

आपल्या परिवाराची काळजी अजितदादांना होती, पण दादांनाही इतर व्यक्ती कोणी येऊन बारामतीमध्ये भाषण केलेले आवडायचे नाही. ज्या सुप्रियाताई विषयी शरद पवार यांनी मुख्यमंत्री साठी स्वप्न पहिले, त्या सुप्रिया ताई सुळे एखादा एनजीओ उत्तम पद्धतीने चालवू शकतात.

सध्या त्यांचे जे काही सुरु आहे ते, वडिलांच्या पुण्याईने सर्व काही सुरु आहे. ते किती दिवस चालणार आहे? कुणास ठाऊक? शरद पवार यांनी चांगुलपणात, सामाजिक दृष्टिकोनातून जेजे उभे केले त्याचा चिवडा करण्यामध्ये सुप्रिया सुळे यांनी काहीही कसर सोडली नाही, असेही अनेकजण आता उघडपणे बोलतात.




पी. ए. म्हणून संधी देऊन मंत्री केलेल्या दिलीप वळसे पाटील यांच्यासारखी अनेक उदाहरण आपल्या समोर आहेत. ज्यांना शरद पवार यांची साथ सोडताना थोडीही लाज वाटली नाही. अशा बिनलाजी माणसांच्या संख्येने दोन्ही राष्ट्रवादी शिगोशीग भरली आहे. जे अति बेईमान होते, ते भाजपवासी झाले.

राष्ट्रवादी फुटण्याचे तसे अनेक कारणे आहेत. सर्वात महत्त्वाचे कारण सुप्रिया सुळे आहेत, हे राष्ट्रवादीमधील नेते जाहीरपणे आता बोलू लागले आहेत. दोन्ही राष्ट्रवादीच्या कार्यक्रमात सुप्रिया सुळे यांच्या एकूण पराक्रमाची चर्चा होती. कोणी काहीही म्हणो, येथेही शरद पवार यांचा मवाळ आणि साधा सरळ स्वभाव कारणीभूत ठरला. अजितदादांनी शरद पवार यांनी केलेल्या चुका कधीही होऊ दिल्या नाही.

पार्थ पवार जिथे चुकतील तिथे पार्थ पवार यांचे कान टोचले. ते सुप्रिया ताई सुळे यांच्या बाबतीत शरद पवार यांना जमले नाही. आता पार्थ आणि जय या दोन्ही लाडोबाला सरळ करण्यात सुनेत्रा पवार यांना जमणार नाही? जर जमले असते तर पक्षात होणारी अनेकांची कुचंबना नक्की टळली असती.

रोहित पवार यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत, पण त्यांची चमकोगिरी कधी संपणार आहे देवाला माहित? जुन्या आणि नव्याचा खेळ करणे कधी संपणार नाही, या खेळाचा करेक्ट कार्यक्रम करण्यासाठी भाजप नावाचा बोका तयार आहे, आणि त्या बोक्याची दोरी देवेंद्र फडणवीस नावाच्या माणसाच्या हाती आहे.

आज प्रश्न एवढाच नाही की राष्ट्रवादी का फुटली? चव नसलेले दोन्ही वर्धापनदिन का झाले? किंवा शरद पवार कुठे चुकले? सुप्रिया सुळे वर्धापन दिनाच्या स्टेजवर का नव्हत्या? खरा प्रश्न हा आहे की, ज्या शरद पवार नावाच्या माणसाने आयुष्यभर हजारो कार्यकर्ते, शेकडो नेते, असंख्य संस्था आणि एक मोठी राजकीय परंपरा उभी केली, त्या परंपरेचे वारसदार नेमके कोण आहेत?

सत्ता, पदे आणि संपत्ती यांचा वारसा मिळवणे सोपे असते; पण लोकांच्या मनात घर करणाऱ्या नेतृत्वाचा वारसा मिळवण्यासाठी त्याग, संयम, दूरदृष्टी आणि माणसे जोडण्याची क्षमता लागते. आज दोन्ही राष्ट्रवादीच्या व्यासपीठावर त्या वारशासाठीची धडपड दिसते; पण त्या वारशाला न्याय देणारी उंची मात्र कुठेच दिसत नाही.

शरद पवार यांनी आयुष्यभर माणसे जोडली, पण त्याच माणसांनी वेळ आल्यावर त्यांना सोडले. त्यांनी विश्वास ठेवला, पण अनेकांनी त्याच विश्वासाचा सौदा केला. त्यांनी घर सांभाळण्याचा प्रयत्न केला, पण घरातीलच भिंती एकमेकांवर कोसळल्या. ही केवळ एका पक्षाची शोकांतिका नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठा धडा आहे.

आजही दोन्ही राष्ट्रवादीमध्ये गर्दी आहे, झेंडे आहेत, घोषणा आहेत; पण विचार कुठे आहे? दिशा कुठे आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कार्यकर्त्यांच्या भविष्याची मी कुठे आहे? जर दोन्ही गटांनी व्यक्तिपूजा, घराणेशाही, गटबाजी आणि स्वार्थाच्या राजकारणातून बाहेर पडून नव्याने आत्मपरीक्षण केले नाही, तर येणाऱ्या काळात राष्ट्रवादीचे अस्तित्व केवळ इतिहासाच्या पुस्तकांपुरते उरेल. कारण पक्षांना संपवण्यासाठी विरोधकांची गरज नसते; पक्षातील महत्त्वाकांक्षा, अहंकार आणि चुकीचे वारसदारच पुरेसे असतात.

महाराष्ट्राच्या राजकारणात अजूनही शरद पवार हे एक मोठे पर्व आहेत. पण प्रत्येक पर्वाचा एक शेवट असतो. प्रश्न एवढाच आहे की, त्या पर्वानंतर उरणार काय, एक मजबूत राजकीय वारसा की तुकडे-तुकडे झालेली एक आठवण? हीच खरी धोक्याची घंटा आहे... आणि तिचा आवाज ऐकण्याची वेळ आता निघून चालली आहे.

---------------

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे समूह संपादक आहेत.)



*राष्ट्रवादीच्या वर्धापन दिन कार्यक्रमातील हा फोटो अनेक प्रश्न उपस्थित करतो. वयोमान, प्रकृतीची अडचण आणि स्पष्टपणे सुजलेले पाय यामुळे शरद पवार यांना एका जागी काही मिनिटेही बसणे कठीण जात असल्याचे दिसत होते. तरीही त्यांना या कार्यक्रमात उपस्थित राहावे लागले. पक्षाच्या अस्तित्वासाठी अजूनही एका ८५ वर्षीय नेत्याच्या खांद्यांवर एवढा मोठा भार का आहे, हा प्रश्न या छायाचित्रातून अधिक ठळकपणे समोर येतो.*

# डॉ. राजेश नाईक : ९४ वेळा रक्तदान करणारे समाजसेवक

प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे डॉ. राजेश नाईक. रक्तदानाच्या माध्यमातून गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी केलेली समाजसेवा आज अनेकांसाठी प्रेरणेचा स्त्रोत ठरली आहे. ९४ वेळा त्यांनी रक्तदान केले.



डॉ. राजेश नाईक यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणीवा आणि मानवी मूल्यांचे संस्कार झाले. शिक्षण घेत असतानाच त्यांना समाजातील गरिबी, दुःख आणि अडचणींची जवळून जाणीव झाली.

समाजात काहीतरी वेगळे आणि अर्थपूर्ण करण्याची भावना त्यांच्या मनात रुजली. स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला.

या विचारांनीच त्यांच्या जीवनाला सामाजिक बांधिलकीची दिशा दिली. डॉ. नाईक यांच्या रक्तदानाच्या प्रवासाची सुरुवात १९ जानेवारी १९९५ रोजी झाली. त्या वेळी ते अवघे १९ वर्षांचे होते.

एका गरजू रुग्णाला तातडीने रक्ताची आवश्यकता असल्याचे समजताच त्यांनी कोणताही विचार न करता रक्तदान केले. त्या एका कृतीमुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात, याची त्यांना जाणीव झाली आणि त्याच क्षणापासून रक्तदान हे त्यांच्या जीवनाचे एक महत्त्वाचे ध्येय बनले. नंतर त्यांनी कधीही मागे वळून बघितले नाही.



कीर्ती काळमेघ (वनकर)

रक्तदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून ती जीवनदान देणारी सामाजिक चळवळ सुद्धा आहे, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. प्रत्येक रक्तदानामागे एखाद्या कुटुंबाचा आनंद, एखाद्या आईचे समाधान, एखाद्या रुग्णाला मिळालेली नवसंजीवनी दडलेली असते, असे ते मानतात.

डॉ. नाईक यांनी केवळ स्वतः रक्तदान केले नाही, तर समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण करण्याचेही महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. अनेक रक्तदान शिबिरांचे आयोजन करून डॉ. राजेश नाईक हजारो नागरिकांना रक्तदानासाठी प्रेरित करतात.

विशेषतः युवकांमध्ये रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी ते सातत्याने जनजागृती करतात. त्यांच्या प्रेरणेमुळे अनेक युवक नियमित रक्तदाता बनलेले आहेत. त्यामुळे रक्तदानाची चळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी बनण्यास सातत्याने मदत होत आहे.

रक्तदानासोबत डॉ. नाईक विविध सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेतात. एड्स जनजागृती मोहीम, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन, साक्षरता अभियान, प्रौढ शिक्षण, युवक मार्गदर्शन, सामाजिक प्रबोधन आणि विविध जनकल्याणकारी कार्यक्रमांमध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांविषयी त्यांना विशेष आस्था आहे. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ रक्तदानापुरते मर्यादित न राहता व्यापक समाजसेवेचे रूप धारण केलेले आहे.

त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय संस्थांनी वेळोवेळी घेतलेली आहे. महाराष्ट्र राज्य रक्तसंक्रमण परिषदेसह विविध समित्यांमध्ये सदस्य म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

आजच्या काळात समाजात जात, धर्म, पंथ, भाषा आणि आर्थिक स्तर यांच्या आधारावर भेदभाव होताना दिसतो. परंतु, रक्तदान ही अशी सेवा आहे जिथे कोणताही भेदभाव नसतो. रक्ताला धर्म नसतो, जात नसते आणि सीमा नसतात.

डॉ. राजेश नाईक हे आपल्या कार्यातून हा संदेश समाजाला सातत्याने देत आहेत. त्यांच्या रक्तदानातून समाजात माणुसकीचे नाते अधिक दृढ होत आहे. डॉ. नाईक नेहमीच मानवतेला सर्वोच्च स्थान व प्राधान्य देत आहेत.

---------------

(लेखिका सामाजिक कार्यात सहभागी असतात.)

# ब्लॅक मनी ॲक्ट (काळ्या पैशाचा कायदा) सरकारला का आणावा लागला?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**




आपण गेल्या काही आठवड्यापासुन काळ्यापैशा बद्दलची श्वेत माहिती जाणुन घेत आहोत. आज पासुन आपण ब्लॅक मनी ॲक्ट या कायद्याची माहिती घेणार आहोत.

**प्रश्न : ब्लॅक मनी ॲक्ट (काळ्या पैशाचा कायदा) सरकारला का आणावा लागला?**

■ हा कायदा भारतात आणण्याच्या मागची प्रस्तावना किंवा उदेश्य असा आहे की प्रसिद्ध विधीज्ञ रामजेठमलानी यांनी सुप्रीम कोर्टाच्या माध्यमाने सरकारला जागे केले की भारता बाहेर विदेशात अनेक लोकांची उत्पन्न असून फॉरेन मध्ये त्यांची मालमता पण आहेत, ज्यावर सरकार चे अंकुश नाही, कंट्रोल नाही तोच काळा पैसा पुन्हा भारतात वेगळ्या मार्गाने येत असत.

**प्रश्न : काळ्या पैश्याचा कायदा केल्यानंतर भारताच्या आतला काळा पैसा कमी झाला का?**

■ हा कायदा सरकार ने पास केल्यानंतर ही भारताच्या आतील काळ्या पैशावर काही खास असर झाले नाही. कारण हा कायदा भारतात कमवून पैसे विदेशात पाठवले, किंवा विदेशातून उत्पन्न असेल अथवा विदेशात मालमता असेल तरच ब्लॅक मनी ॲक्ट २०१५ लागू आहे.

भारताच्या आतील काळ्या पैशासाठी वेगवेगळे कायदे कार्यांकित आहे, सरळ काळा पैसा कायदा नाही. कारण या कायद्याचे स्वरूपच तसे आहे. काही तज्ञांचे स्पष्ट मत आहे की काळा पैसा कायदा जसे विदेशी उत्पन्न आणि विदेशीमाल्मतेसाठी आहे, तसाच एक्सप्लिसीट ब्लॅक मनी ॲक्ट फॉर इंडियन अंकम ॲन्ड ॲसेट ही असला पाहिजे. मनी लॉण्डरिंग कायदा सुद्धा भारतात लागु आहे.

सिनियर कौन्सिल पी. व्ही. कपुर यांनी निर्दशनास आणून दिल्या नंतर या कायद्याची अमलबजावणीची तारीख पुर्वलक्षी करण्यात आली आणि त्याच प्रमाणे मनोहर रामकृष्ण विरुद्ध जी. जी. देसाई या केस मध्ये काही शब्द बदलून काही सूचना मान्य करण्यात आल्या.

परंतु आपण त्या खोलात जास्त न जाता विदेशी उत्पन्न तथा मालमत्तेबद्दल जास्त चर्चा करणार नाही. ज्यांना परदेशी, उत्पन्न असेल त्यांच्यासाठी हा कायदा जास्त लागु आहे.

इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम ११६ प्रमाणे जे आयकर अधिकारी असतील तेच या कायद्यासाठी पण असतील. जर बोर्ड ने खास निर्देश दिले असतील तर निर्देशित अधिकारी काम करतील; तथा प्रसंगी ईडीची ही मदत घेतील.

ब्लॅकमनी कायदा विदेशी उत्पन्न तथा विदेशी माल्मतेसंबधी जास्त असल्यामुळे आपण या विषयी जास्त चर्चा न करता पुढच्या वेळी नवीन विषय बघणार आहोत, जे नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात राहणार आहे .

■ ■ ■

## वाचक लिहितात...

विदर्भात ठिकठिकाणी बियाणे आणि खतांचा काळाबाजार होत असल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून वाचायला मिळत आहेत. अनेक ठिकाणी साठेबाजी सुरू असून, चढ्या दराने शेतकऱ्यांना खते आणि बियाणे विकण्याचा प्रकार सुरू आहे. खत आणि बियाण्यांसाठी कृषी केंद्रासमोर शेतकऱ्यांच्या रांगा लागल्याचे इतकेच काय तर त्या केंद्रासमोर शेतकरी झोपल्याचे पाहायला मिळाले. अशा घटना समोर आल्या की कृषी विभाग आणि सरकार कारवाई करू म्हणून बोंबा मारते. परंतु, खरेच कारवाई होते का?

**-निशीकांत सार्वे, कोराडी.**

## लवंगी..

**माणुसकी लयाला गेली**
**काळजावर पडले घट्टे**
**यामुळेच नवीन वाद**
**पांढरे पट्टे, काळे पट्टे**

**गजानन तुपे**
**निवासी संपादक, मुंबई.**

## पावसाळी अधिवेशनात सादर होणार

# महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :

राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक सादरीकरण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा सहभाग आहे. बहुतांश कृषी धोरणे व शासकीय योजना पुरुषकेंद्री आहेत. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा. कृषी क्षेत्रातील महिलांना शेतकरी म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा. पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन अशा विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करणे या बाबींचा समावेश करावा.

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी स्थापन करणे, विधेयकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणा यांचा देखील अभ्यास केला जावा. जिल्हा आणि तालुका व गावस्तरापर्यंत मजबूत यंत्रणा असली पाहिजे. या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती असावी जेणेकरून या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमित परीक्षण करेल. हे विधेयक राज्यातील लाखो महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख, हक्क आणि संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असून कृषी क्षेत्रात लिंगसमतेच्या दिशेने एक नवा आदर्श निर्माण करेल असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या बैठकीला मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकास चंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए शैला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, विधि व न्याय विभागाच्या सचिव सुप्रिया धावरे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, ग्राम विकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, पदुम विभागाचे सचिव डॉ एन.रामास्वामी, तेजश्री उपाध्ये आणि दर्शिता तुमणे यावेळी उपस्थित होते.

# जन्मदात्या आईनेच चार मुलांना विष पाजले

## आईचीही आत्महत्या, दोन मुलींचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, रायगड, दि. १३ :

रायगड जिल्ह्यात मन हेलावून टाकणारी एक घटना समोर आली आहे. माणगाव तालुक्यातील खरवली येथील आदिवासी वाडीवर राहणाऱ्या एका महिलेनी तिच्या चार निष्पाप मुलांवा थंड पेयातून विष देऊन स्वतःही विषप्राषन करून आत्महत्या केली आहे. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

या घटनेमुळे माणगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. महिलेने हे टोकाचे पाऊल का उचलले हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, माणगाव जवळील खरवली आदिवासी वाडीवर ही घटना घडली. आशा जाधव या २९ वर्षीय महिलेने बाजारातून थंड पेय आणले. त्यात कुठले तरी विषारी औषध मिसळले, नंतर ते आपल्या चार लहान मुलांना पिण्यासाठी दिले. नंतर स्वतःही ते प्राशन केले.

थंडपेय प्यायल्यानंतर काही वेळातच मुलांना आणि आईला उलट्यांचा त्रास होऊ लागला. हा प्रकार आजूबाजूच्या नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने महिलेसह चारही लहान मुलांना उपचारासाठी माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

मात्र रुग्णालयात उपचार सुरू असतांनाच विषबाधेमुळे महिलेचा आणि दोन मुलींचा मृत्यू झाला. इतर दोन मुलांची प्रकृती चिंताजनक आहे. आशा जाधव वय २९, नंदिनी जाधव वय ७ आणि दुर्वा जाधव वय ६ या तिघांचा या दुर्दैवी घटनेत मृत्यू झाला. तर विषबाधेत बचावलेल्या इतर दोन मुलांवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांना वाचविण्यासाठी वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी शर्तीचे प्रयत्न करत आहेत

घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. मृत महिलेचे नातेवाईक आणि तीचा पती यांच्याकडून महिती घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

## मोबाइलवर चित्रफीत करून तरुणाची आत्महत्या

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १३ :

पत्नी, तिचे कुटुंबीय, तसेच मित्राकडून दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे धायरी भागातील एका तरुणाने मोबाइलवर चित्रफीत तयार करून आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिसांनी पत्नीसह, तिचा मित्र, कुटुंबीयांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या बाबत तरुणाच्या मोठ्या भावाने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पत्नी, तिचा मित्र आणि कुटुंबीयांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेला ३७ वर्षीय तरुण मुंबईतील एका खासगी कंपनीत कामाला होता. वादामुळे तो पत्नीपासून विभक्त झाला होता. ३ मे रोजी त्याने धायरीतील सदनिकेत आत्महत्या केली होती.

या प्रकरणी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली होती. पोलिसांनी आत्महत्या केलेल्या तरुणाचा मोबाइल संच ताब्यात घेतला.

## वादळी वाऱ्यामुळे भिंत कोसळून

# बाप-लेकाचा मृत्यू

■ वृत्तसंस्था,
छत्रपती संभाजीनगर, दि. १३ :

फुलंब्री तालुक्यात शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास ताशी ४० किमी वेगाने आलेले वादळी वारे एका कुटुंबाला पार उदध्वस्त करून परतले. या वादळवाऱ्याने आडगाव खुर्द येथील एका शेतातील शेडची भिंत कोसळून बाप-लेकाचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य एक ७ वर्षांचा चिमुकला गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) उपचार सुरू आहेत. ताराचंद हिरालाल जोनवाल (वय ५०) आणि त्यांचा मुलगा अनिकेत ताराचंद जोनवाल (१३) अशी मृतांची नावे आहेत. तर आरुष शिवलाल जोनवाल (७) हा गंभीर जखमी झाला.

ताराचंद जोनवाल हे शुक्रवारी व रात्री नेहमीप्रमाणे आपला मुलगा अनिकेत आणि पुतण्या आरुषसह शेतातील शेडमध्ये शेळ्या बांधण्याचे काम करत होते. त्या वेळी वादळामुळे शेडची भिंत कोसळली. या ढिगाऱ्याखाली तिघेही दबले गेले. घटनेचा आवाज होताच आसपासच्या ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. ढिगाऱ्याखालून तिघांनाही बाहेर काढून तातडीने फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून ताराचंद आणि अनिकेत या बाप-लेकाला मृत घोषित केले. तर आरुषला पुढील उपचारासाठी घाटीत हलवले. या घटनेने जानवाल कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## बस, व्हॅनच्या शुल्कात १५ टक्क्यांची वाढ

**मुंबई :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याबरोबर पालकांना महागाईचा आणखी एक फटका बसला आहे. जून अखेरीस सुरू होणाऱ्या शाळांसाठी बस आणि व्हॅनच्या शुल्कात १५ टक्कयांनी वाढ झाली आहे.

इंधन दरवाढ, वाहन देखभाल खर्च, विमा, टोल आणि चालक-कर्मचाऱ्यांच्या वाढलेल्या वेतनामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बस आणि व्हॅनमालक संघटनेकडून सांगण्यात आले आहे. पालकांवरील भार टाळण्यासाठी राज्य सरकार, परिवहन मंत्रालय आणि अंमलबजावणी प्राधिकरणांकडे सहायक यंत्रणा आणि पर्यायी उपायांची विनंती करणारी अनेक निवेदने शालेय वाहन चालक-मालक संघटनेकडून सादर करण्यात आली.

# योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :

योग ही भारताने जगाला दिलेली सर्वात मौल्यवान देणगी आहे. योग केवळ शारीरिक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांच्यात सुसंवाद निर्माण करणारी जीवनपद्धती असल्याचे प्रतिपादन पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आज केले. आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 च्या पार्श्वभूमीवर सर्व देशांच्या महावाणिज्यदूत व मानद वाणिज्यदूतांसाठी आयोजित केलेल्या विशेष योग सत्राच्या उदघाट्नप्रसंगी ते बोलत होते.

राजशिष्टाचार विभाग आणि कैवल्यधाम योग संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मरीन ड्राईव्ह येथील संस्थेच्या सभागृहात शनिवारी सकाळी हे विशेष सत्र उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. मंत्री रावल यांच्या हस्ते योग सत्राचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक शंखनादाने करण्यात आली. त्यानंतर कैवल्यधाम संस्थेचे



विश्वस्त निवित श्रीवास्तव यांनी मंत्री जयकुमार रावल यांचे स्वागत केले. कैवल्यधाम या भारतातील सर्वात जुन्या योग संशोधन व शिक्षण संस्थेचे संस्थापक स्वामी कुवलयानंद यांच्या प्रतिमेस मंत्री रावल आणि मान्यवरांनी पुषार्पण केले.

यावेळी मंत्री रावल म्हणाले, आंतरराष्ट्रीय योग दिनाला संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेली जागतिक मान्यता ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे योगाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. विविध देश, संस्कृती आणि परंपरांतून आलेल्या समाजास आरोग्य, शांतता आणि आनंद या समान मूल्यांनी जोडण्याचे सामर्थ्य योगामध्ये आहे. योगाच्या शास्त्रीय परंपरेचे जतन आणि प्रसार करण्यासाठी कैवल्यधाम संस्थेने केलेल्या शतकोत्तर कायार्चे कौतुक त्यांनी यावेळी केले.

यावेळी कैवल्यधाम योग संस्थेच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांनी उपस्थितांना विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करून त्यांचे आरोग्यविषयक लाभ समजावून सांगितले. योग सत्रात युगांडा, अर्जेंटिना, न्यूझीलंड, बांगलादेश, ब्रिटन, घाना, जपान, युक्रेन, फ्रान्स, झेक प्रजासत्ताक, सिंगापूर, इजिप्त, नॉर्वे, ब्राझील, मॉरिशस, थायलंड, तुर्की, कॅनडा, आयर्लंड, येमेन, बेलारूस, मेक्सिको, श्रीलंका, दक्षिण कोरिया, पेरू आणि ग्रीस आदी 26 देशांचे महावाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उच्चायुक्त तसेच त्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

# आपत्कालीन परिस्थितीचा इंटिग्रेटेड प्लॅन करा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :



पावसाळ्यात पूर परिस्थितीचे नियोजन करताना रेल्वे, महापालिका, बेस्ट आणि, जिल्हाधिकारी कार्यालये, मेट्रो आणि अन्य प्राधिकरणे यांनी इंटिग्रेटेड प्लॅन तयार करुन समन्वयाने काम करा, अशा सूचना मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज केल्या.

मुंबईतील रेल्वेच्या हद्दीत येणाऱ्या नालेसफाईच्या कामाचा व मान्सून पुर्व कामाचा आढावा घेण्यासाठी मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. शेलार यांनी पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयात समन्वय बैठक घेतली. या बैठकीला मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक हिरेश मिणा, पश्चिम रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक पंकज सिंग यांच्यासह मुंबई शहर आणि उपनगराचे जिल्हाधिकारी, महापालिका, रेल्वे, फायर ब्रिगेडचे अधिकारी उपस्थित होते.

पश्चिम रेल्वेने सांगितले की, पाण्याचा निचरा करण्यासाठी चर्चगेट ते विरार या दरम्यान एकुण 15 मायक्रो टनेल रेल्वे ट्रॅक खालून करण्यात आले असून या वर्षात 4 मायक्रो टनेल पूर्ण करण्यात आले आहे. तर पाणी उपसण्यासाठी पंपांची संख्या वाढवून यावेळी 126 पंप बसवण्यात आले आहेत तर 2400 व्हॅगन इतका गाळ काढण्यात आला आहे. तर मध्य रेल्वेच्या मार्गावर ही पंपाची संख्या वाढवण्यात आली असून 220 पंप बसवण्यात आले आहेत. 350 किलोमिटर लांबीच्या मार्गावरील 160 नाले व गटारांची सफाई करण्यात आली आहे. दोन्ही मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे आणि पर्जन्यमापक बसवण्यात आले आहेत. यावेळी कांजूर मार्ग येथील उषा नगर नाला आणि कुर्ला येथील ब्राम्हणवाडी नाल्याच्या खोली करण आणि रुंदीकरणाची कामे करण्यात आल्याने पाण्याचा निचरा वेगाने होऊ शकेल, असे रेल्वेकडून सांगण्यात आले. दरम्यान दोन्ही रेल्वेचे सादरीकरण झाल्यानंतर मुंबई महापालिका आणि फायर ब्रिगेडने त्यांच्या काही सूचनाही केल्या. पुर्वी पेक्षा आता रेल्वे आणि महापालिका यामध्ये समन्वय अधिक चांगल्या प्रकारे होत असल्याचे दोन्ही कडून सांगण्यात आले.

# संजय राऊत स्वतःच काँग्रेसच्या वाटेवर

## शिंदेंच्या महिला खासदाराचा खळबळजनक दावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :



महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरू असतानाच, शिवसेना (शिंदे गट) खासदार ज्योती वाघमारे यांनी उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्यावर अत्यंत बोचरी टीका केली आहे. "संजय राऊत यांना आता पक्षात कोणी विचारत नाही. त्यांना आगामी काळात राज्यसभेची उमेदवारी मिळेल की नाही, याचीही शाश्वती नाही; म्हणूनच ते स्वतः काँग्रेसच्या वाटेवर आहेत," असा खळबळजनक दावा खासदार वाघमारे यांनी केला आहे. त्यांच्या या विधानाने राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

संजय राऊत शिवसेना सोडणार आणि काँग्रेसमध्ये जाणार, यावर सुरुवातीला कोणाचाही विश्वास बसणार नाही, अशी स्थिती असली तरी ज्योती वाघमारे यांनी ठाकरे गटाच्या बदललेल्या भूमिकेवर बोट ठेवले. त्या म्हणाल्या, "आमचा पक्ष हा मूळ हिंदुत्वाचा पक्ष आहे. मात्र, संजय राऊतांच्या पक्षाने (ठाकरे गट) कधीच हिंदुत्व सोडले असून त्यांनी काँग्रेससोबत सलगी केली आहे. त्यामुळे राऊत काँग्रेसमध्ये जाणे फारसे आश्चर्यकारक नाही."

ठाकरे गटाचे खासदार फुटणार आणि उपमुख्यमंत्र्यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार, या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चेमुळे ठाकरे गटात कमालीची अस्वस्थता आहे. याच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी उद्या, १४ जून रोजी 'मातोश्री'वर घाईघाईने खासदारांची बैठक बोलावली आहे.

## पत्नी व दोन मुलांसह शिक्षकाची आत्महत्या

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १३ :

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील हत्तीज येथे एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून, एका कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या योगेश बाळासाहेब पाटील यांनी पत्नी आणि दोन मुलांना विष देऊन त्यानंतर स्वतः गळफास घेत जीवन संपवल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.या घटनेत योगेश पाटील (वय सुमारे 40), त्यांची पत्नी माधुरी पाटील (37), मुलगा अथर्व (11) व शिवांश (9) यांचा मृत्यू झाला आहे.

प्राथमिक तपासानुसार, योगेश पाटील हे नंदुरबार जिल्ह्यातील चौगाव बु. येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. शाळेला सुट्टी असल्याने ते काही दिवसांपूर्वी हत्तीज येथे आले होते. आर्थिक अडचणी आणि शेअर बाजारातील मोठ्या नुकसानीच्या तणावातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## नाशिक विधान परिषदेचे मतदार सहलीसाठी रवाना

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. १३ :

कोणत्याही प्रकारचा धोका पत्करू नये अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आल्यामुळे नाशिकचे महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे कमालीचे सावध झाले आहे.

स्थानिक स्वराज्य मतदारसंघातील निवडणुकीत त्यांचा मार्ग अपक्ष उमेदवार गोकुळ गिते आणि प्रसाद हिरे यांनी प्रचार थांबविल्यानंतर सुकर झाला असला, तरी महायुतीने सावध भूमिका घेतली आहे. त्याच पार्श्वभूमीवर मतदार नगरसेवकांची 'सहल' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, कालच नगरसेवकांचा ताफा ठाण्याकडे रवाना झाल्याचे वृत्त आहे.

उमेदवारांच्या माघारीमुळे दराडे यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात होता. मात्र अपक्ष उमेदवारांचे अर्ज कायम राहिल्याने महायुतीच्या गोटात धाकधूक सुरूच आहे. शेवटी जिल्ह्यातील सर्व महायुतीचे लोकप्रतिनिधी एकत्र आले व त्यांनी सहलीचा मार्ग काढला. या पार्श्वभूमीवर मंत्री उदय सामंत, गिरीश महाजन, नरहरी झिरवाळ आणि दादा भुसे यांनी नाशिकमधील आमदार व माजी मंत्री माणिकराव कोकाटे आमदार देवयानी फरांदे राहुल ढिकले दिलीप काका बनकर यांच्या समवेत बैठक घेऊन मतदारांना 'फिरायला' घेऊन जाण्याचे नियोजन केले. नगरसेवकांना मुंबई किंवा ठाण्यातील पंचतारांकित हॉटेलमध्ये मुक्कामासाठी नेले जाणार आहे. महायुतीकडे एकूण ६१९ पैकी ४६६ मतदार आहेत. सर्व मतदार एकत्र आल्यानंतर त्यांना मतदान प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# २३-२४ जून विठ्ठल मंदिर दर्शनासाठी पूर्णपणे बंद

■ वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. १३ :

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पंढरपूरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर 23 आणि 24 जून रोजी सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. विठ्ठलाच्या मूतीर्ची झीज रोखण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून विशेष संवर्धन आणि लेपन प्रक्रिया करण्यात येणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. मंदिर प्रशासनाने देशभरातील वारकरी, भाविक आणि पर्यटकांना या दोन दिवसांत पंढरपूरला दर्शनासाठी येऊ नये, असे आवाहन केले आहे.

श्री विठ्ठलाच्या मूर्तीची नैसर्गिक झीज वाढत असल्याचे निरीक्षण समोर आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समिती, वारकरी प्रतिनिधी आणि पुरातत्त्व विभागाची बैठक झाली होती. या बैठकीत मूतीर्चे पारंपरिक की रासायनिक पद्धतीने संवर्धन करायचे यावर सविस्तर चर्चा झाली. अखेरीस तज्ज्ञांच्या शिफारशींनुसार 22 ते 24 जूनदरम्यान रासायनिक पद्धतीने मूर्तीवर संरक्षक लेपन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

माहितीनुसार, विठ्ठलाच्या मूर्तीच्या पायाजवळ झीज होऊन खड्ड्यासारखा भाग निर्माण झाला आहे. तसेच इतर काही भागांमध्येही झीज झाल्याचे निदर्शनास आले आहे. यासाठी मूर्तीच्या मूळ दगडाशी सुसंगत दगडी पावडर आणि विशेष सेंद्रिय रसायनांचा वापर करून झिजलेल्या भागांची दुरुस्ती केली जाणार आहे. यासोबतच मूर्तीचे आयुष्यमान वाढावे यासाठी संरक्षक आवरण देखील दिले जाणार आहे.



संपूर्ण संवर्धन प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग (अरक), राज्य पुरातत्त्व विभाग आणि मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. मंदिर प्रशासनाच्या मते, विठ्ठलाच्या मूतीर्चे पावित्र्य कायम राखत वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन करणे हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे.

विठ्ठलाच्या मूर्तीचे यापूर्वीही वेळोवेळी संवर्धन करण्यात आले आहे. सन 1988, 2005, 2012, 2020 या चार टप्प्यांमध्ये मूर्तीवर लेपन आणि संरक्षणाची कामे झाली होती. आता जवळपास पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा संवर्धनाची आवश्यकता निर्माण झाल्याने ही प्रक्रिया राबवली जात आहे.

आषाढी वारीसाठी राज्यासह देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होणार आहेत. त्याआधी मूर्तीचे संवर्धन पूर्ण व्हावे आणि दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवता यावी यासाठी मंदिर प्रशासनाने 23 व 24 जून रोजी पंढरपूरला येण्याचे नियोजन टाळावे, असे स्पष्ट आवाहन केले आहे. विठुरायाच्या मूर्तीचे जतन आणि भावी पिढ्यांसाठी तिचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# द महाराष्ट्र फाईल्सचा प्रीमियर दिमाखात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :

धुळे जिल्ह्यातील शेतकरी धर्मा पाटील यांच्या मृत्यूने देशाचे लक्ष वेधून घेतले. न्याय आणि योग्य मोबदल्यासाठीच्या त्यांच्या संघर्षाने प्रशासन व्यवस्था, शेतकऱ्यांचे प्रश्न याबाबत व्यापक चर्चा घडली. याच सामाजिक वास्तवाला स्पर्श करणारा आणि व्यवस्थेविरोधातील सामान्य माणसाच्या संघर्षाची कहाणी मांडणारा मराठी चित्रपट द महाराष्ट्र फाईल्सचा प्रीमियर सोहळा नुकताच उत्साहात आणि दिमाखात झाला.

चित्रपटाचे दिग्दर्शक, लेखक, पटकथाकार आणि निर्माते संजीव कुमार राठोड, क्रिएटिव्ह प्रोड्युसर शालिनी राठोड, आर्यन राठोड, नागेश भोसले, गौतमी पाटील, शकील शेख, बंजारा समाजातील कुटुंबीय, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती, माध्यम प्रतिनिधी तसेच




धुळ्याचे शेतकरी धर्मा पाटील यांच्या संघर्षाची कहाणी

चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. प्रीमियरनंतर चित्रपटाची सर्वत्र चर्चा रंगली असून सामाजिक आशय, वास्तववादी कथानक आणि प्रभावी मांडणीमुळे प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. आता हा चित्रपट राज्यभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

समाजातील वंचित, दुर्बल आणि न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या घटकांच्या वेदना, भावना आणि वास्तव यांचे चित्रण द महाराष्ट्र फाईल्समध्ये करण्यात आले. शासन दरबारी न्याय मिळवण्यासाठी सामान्य माणसाला करावा लागणारा संघर्ष, व्यवस्थेतील अडथळे, शेतकरी आणि उपेक्षित समाजाच्या समस्या यांचे वास्तवदर्शी दर्शन या चित्रपटातून घडते. विशेष म्हणजे बंजारा समाजाच्या न्याय, हक्क आणि अस्तित्वाच्या प्रश्नांना पडद्यावर स्थान देणारा हा देशातील पहिला चित्रपट आहे.

धर्मा पाटील यांच्या संघर्षातुन प्रेरणा घेत, समाजातील अनेक न ऐकल्या गेलेल्या आवाजांना आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सामान्य माणसांच्या वेदनांना या चित्रपटातून अभिव्यक्त करण्यात आले आहे.

चित्रपटाच्या निर्मितीपासून ते प्रदर्शनापर्यंतचा प्रवास अनेक आव्हानांनी भरलेला असला, तरी सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा विषय प्रेक्षकांपर्यंत पोचवण्याचा टीमचा प्रयत्न आहे.

**नाडकर्णी, सयाजी शिंदेंची भूमिका**

चित्रपटात उषा नाडकर्णी, मंगेश देसाई, वीणा जामकर, सयाजी शिंदे, नागेश भोसले, सुनील गोडसे, सन्नी लिओनी, सपना चौधरी, आर्यन राठोड, गौतमी पाटील आणि मंगली यांच्या भूमिका आहेत. चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी नितीन सावंत, अजित केतकर आणि सिद्धार्थ कश्यप यांनी सांभाळली आहे.

दमदार कथा, अभिनय, सामाजिक आशय आणि वास्तवाला भिडणारी मांडणी यांचा उत्कृष्ट संगम असलेला द महाराष्ट्र फाईल्स हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा आणि विचारप्रवृत्त करणारा आहे. प्रीमियर शोदरम्यान चित्रपटाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, माध्यमांमधून होत असलेली चर्चा आणि प्रेक्षकांकडून व्यक्त होणाऱ्या सकारात्मक प्रतिक्रिया पाहता, द महाराष्ट्र फाईल्स हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास चित्रपटाच्या टीमने व्यक्त केला.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. **Group Editor-in-Chief and Director - Shrikrishna Tansukhdas Chandak**, Group Editor - **Sandeep Ramrao Kale**, Managing Editor - **Pankaj Shrikrishna Chandak**, Resident Editor - **Gajanan Tupe**

महासागर मुंबई

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. समूह मुख्य संपादक व संचालक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३), समूह संपादक - संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक - पंकज श्रीकृष्ण चांडक
निवासी संपादक - गजानन तुपे Email : mumbaimahasagar@gmail.com

RNI No.: MAHAMAR/2016/79101